# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL. IV — AKOLA:—SATURDAY EVENING, OCTOBER 2, 1869 — NO. 39

पुस्तक ४ — अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २ माहे आक्टोबर सन १८६९ इ० — अंक ३९


## मुंबई इलाखा.

मुंबई इलाख्यांतील वसूल वासलात वगैरे विषयींच्या माहितीचा सरकारि कागद गेल्या आठवड्यांतील मुंबई ग्याझेट नावाच्या नित्याच्या वर्तमान पत्रांत छापलेला आहे तो आमचे पाहण्यांत आला त्यांतील कांहीं गोष्टी आम्हीं आपले वाचणारां करितां लिहितो. ही माहिती सन १८६८।६९ या हिशेबी सालाची म्हणजे तिगस्त सालची आहे.

| | रु० |
|---|---|
| मुंबई इलाख्याचें जमीनबाब उत्पन्न | ३,१९,२७,४१० |
| पैकी वजा | |
| दुमालदारांस वगैरे द्यावें लागलें तें | ६०३०३८८ |
| बाकी | २,५४,९७,०२२ |
| पैकीं वजा | |
| सूट | ३,०५,२४१ |

बाकी निवळ जमा २,५१,९१,७८१

गुदस्त सालीं जी सूट द्यावी लागली ती पेक्षां सालमजकुरीं ४६७७७ रुपये कमी लागली व जमा गुदस्त साला पेक्षां १,२८,९१८ रुपये अधिक झाली. व साल अखेर येणें शिलक राहतें तें गुदस्त पेक्षां ५४७३४ रुपये कमी राहिलें आहे.

दुमालदारांचें उत्पन्न यावर्षीं ६४०४७ रुपये अधिक झालें आहे याचें कारण पंच महाल प्रांत नवीन सरकारांत आला त्यांतील नवे दुमाले दार झाले ते, व जुन्या दुमाले गावांची पैमाष होऊन उत्पन्न वाढलें तें, व निळकंठ माधवराव पुरंदरे यांस सरंजामी गाव पांच दिले ते मिळून—

आतां प्रत्येक जिल्ह्या जिल्ह्याची जमा किती व त्यांत सूट किती आहे तें पहा.

| जिल्हे | जमाबंदी | सूट |
|---|---|---|
| उत्तरभाग | | |
| अमदाबाद | ११०९४६४ | २११९ |
| खेडा | २२२१५१३ | ९४६ |
| सुरत | ४२१६५२७ | १०३८०६ |
| [illegible]णें | २१२५४०४ | २७३० |
| खानदेश | ३२७७१४४ | १४८५७ |
| दक्षिणभाग | | |
| पुणें | १९४५२४२ | ४४४९७ |
| अहमदनगर | २१०१७१७ | ११५१ |
| कलादगी | ११५६५०१ | १३० |
| रत्नागिरी | ८७७१८७ | १५६९ |
| बेळगाव | १३१४७९२ | ५२८ |
| धारवाड | १८६८७७० | ० |
| सातारा | १७१२२३० | १५२० |
| कानडा | ११७०५३१ | १३१८६५ |
| | २५४९७०२२ | ३०५२४१ |

मागील साला पेक्षां या सालांत कांहीं जिल्ह्यांत जमाबंदी वाढली व कांहीं जिल्ह्यांत उणी झाली आहे त्या विषयीं थोडा तपशील लिहिला आहे तो—

अमदाबाद जिल्ह्यास फळझाडावरील सरकारी हक्काची विक्री झाली व लागवड वाढली—खेडा जिल्ह्यांत लागवड वाढली व पंच महालांतील जमीनीचे दर वाढले—सुरत जिल्ह्यांत कांहीं गावास पैमाष होऊन नवे दर लागले व लागवड अधिक झाली—ठाणें जिल्ह्यांत वतन संबंधी कर, लागवडीची वाढ, व साऱ्याच्या जमीनींतील दगड, माती नेणारांपासून फी वगैरे मिळून—पुणें जिल्ह्यांत इंदापुर तालुक्यास दुसऱ्यानें पैमाष होऊन दर वाढले, इमारती करितां जागा विकल्या, वनचरायी कुरणें व सरकारी झाडें विकलीं त्या बद्दल— अहमदनगर जिल्ह्यांत लागवड वाढली पडित जमिनी व जंगलें यावरील हक्क विकले, व कांहीं किरकोळ बाबदींचे दर वाढले. —बेळगाव जिल्ह्यांत कांहीं किरकोळ बाबी वाढल्या, व कांहीं इनामगावें व जमिनी खालसात झाल्या.

आतां कांहीं जिल्ह्यांत जमाबंदी कमी झाली त्याचीं कारणें—खानदेश जिल्ह्यांत कांहीं बागाईत जमिनी जिरायति झाल्या, भडगाव तालुक्यांत दर कमी झाले व जमीन बाबिकडील सहा आण्याचा कर सायर बाबेकडे दिला—कलादगी जिल्ह्यांत लागवड कमी झाली, व पडित जमिनीच्या हक्काच्या विक्रीचा कमी वसूल आला—रत्नागिरी जिल्ह्यांत सरकारी साऱ्याबद्दल कांहीं धान्य घेण्याची वहिवाट आहे त्याचा दर कमी लागला—धारवाड जिल्ह्यांत जंगलाचें व वनचरायीचें उत्पन्न कमी झालें, व नरगुंद पेट्यांतील एक आणा सेस लोकल फंडाकडे दिला—सातारा जिल्ह्यांत जप्त इनाम जमीनीचा व वनचराईचा वसूल कमी आला—कानडा जिल्ह्यांत बांबूचें व जळाऊ लाकडाचें आणि फळझाडाच्या विक्रीचें उत्पन्न कमी झालें.

दक्षिण भागांतील जिल्ह्यांत सालमजकुरीं तगाई देण्याचें कारण पडलें नाहीं. उत्तर भागांत तरी खेडा जिल्ह्यांत ८८ व खानदेश जिल्ह्यांत २३९० रुपये तगायी दिली. खानदेशांत ओसाड गावीं भिल्ल व कुणबी लोकांनीं नवी बस्ती केली म्हणून बैलांकरितां वगैरे तगाई घेतली. खानदेशांत मागील सालची तगायी बाकी ५२३८३ रु० येणें आहे.

जमीनीची लागवड कोणते जिल्ह्यांत किती आहे तें—

| | एकर | बिघे |
|---|---|---|
| अमदाबाद | ५१३२९५ | १३९९८ |
| खेडा | ३८००८३ | ११९७३ |
| सुरत | ३१८०५० | १२३२१७८ |
| ठाणें | १३९००४४ | ० |
| खानदेश | २४१११९५ | १४३१३९ |
| पुणें | ३५९८८५१ | ० |
| अहमदनगर | ३४४६१८० | ० |
| कलादगी | १९३८८०८ | ० |
| रत्नागिरी | ७०११२६ | ० |
| बेळगाव | ११००४२५ | ० |
| धारवाड | १५४७७६१ | ० |
| सातारा | १६५२७४१ | ० |
| | १८९९८५५९ | १४०१२८८ |

गुदस्त सालाशीं मेळ पाहतां या सालांत ५८६५७८ एकर जमीनींत अधिक लागवड झाली आहे व २८३१०८ बिघे जमीनींत कमी लागवड झाली आहे.

सायर बाबेचें सर्व जिल्ह्यांचें मिळून उत्पन्न ७०६१३४८ रुपये आहे. यांत दाक्षिण भागांत ४२५९८ रुपयांची वाढ व उत्तर भागांत ५४३५४ रुपयांची कमताई आहे. दक्षिण भागांत सायरचे उत्पन्नांत दुमालदारांचा कांहीं अंश नाहीं. व उत्तर भागांत दुमालदारास मागील सालीं जी रकम मिळाली तिजहून साल मजकुरीं ९८ रुपये कमी मिळाले.

सरसालांत वसुलाचे कामांत जो खर्च लागतो तो या सालीं मागील साला पेक्षां २६८१३ रुपये अधिक लागला.

या प्रमाणें हिशेब आहे.

## अल्लोपनिषध व ब्राम्हणांचें शहाणपण.

कित्येक वर्षांपासून आमच्या ऐकण्यांत मात्र होतें कीं ब्राम्हणांचे परम पवित्र, थोर, व आद्य ग्रंथ जे वेद यांत जशीं बहुत देवतांचीं सूक्तें व उपनिषधें आहेत तसें मुसलमानांच्या देवाचेंही एक उपनिषध म्हणजे स्तोत्र आहे. परंतु हल्लीं एका मित्राच्या कृपेनें तें आमचें हातीं आलें. त्याचा उपयोग आमच्या सर्व प्रिय वाचकांसही व्हावा या हेतूनें तें आम्हीं आज आपल्या पत्रांत घेतों.

अथ अल्लोपनिषध प्रारंभः

अस्मल्लां इल्लेले मित्रावरुणा दिव्यानि- धत्ते ॥ इल्लेले वरुणो राजा पुनर्ददुः ॥ हयामि मित्रो इल्लां इल्लेले इल्लां वरुणो मित्रो तेजस्कामः ॥ होतार मिंद्रो होतार मिंद्रो महा सुरिंद्रहा ॥ अल्लो ज्येष्ठः श्रेष्ठः परमं पूर्णं ब्रम्हाण मल्लां ॥ अल्लो रसूल महंमद रकंबर स्मल्ले अल्लां ॥ अदला बुका मेकाकं ॥ अल्लो बुकं निखातकं ॥ अल्लो यज्ञेन हुते हुत्वा: ॥ अल्ला सूर्या चंद्रा सर्व नक्षत्राणि ॥ अल्लो ऋषीणां सर्व दिव्य इंद्राय पूर्णं ॥ माया परम मंतरिक्षं ॥ अल्ला पृथिव्या अंतरिक्षं ॥ विश्वरूपं दिव्यानि धत्ते ॥ इल्लेले वरुणो राजा पुनर्ददुः ॥ इल्लां कबर इल्लां कबर इल्लां इल्लेले तिल्लल्लः ॥ अल्ला इल्ला अनादि स्वरूपाया अथर्वणी शाखां ॥ न्हीं न्हां न्हीं जनान् पशून् सिध्धान् जलचरान् अदृष्टं कुरु कुरु फट असुर संहारिणीं न्हूं अल्लो रसूल महंमद रकंबर स्मल्ले अल्लां इल्लेलितिल्लल्लः ॥ १ ॥

यांत अल्ला ज्येष्ठ आहे, श्रेष्ठ आहे, पूर्ण आहे, अनादिस्वरूप आहे, यज्ञभाग अल्लास आहे, व सूर्य, चंद्र, नक्षत्रें ऋषी, देव, पृथ्वी, अंतरिक्ष, विश्वरूप सर्व अल्ला आहे इत्यादि सांगितलें आहे.

अल्ला म्हणजे मुसलमानांचा देव त्याचें उपनिषध म्हणजे स्तुती. यजुर्वेदाच्या आपस्तंब शाखेंत उपनिषधें आहेत व त्या प्रमाणेंच याची म्हणण्याची धाटी आहे. या वरून ब्राम्हणानीं मुसलमानी मतासही वेद प्रातिपाद्य केलें आहे असें दिसतें.

मागील बहुत गोष्टींचा विच्यार केला असतां दिसतें कीं ब्राम्हण ही जाति मोठी शाहणी होती. राजसत्ता त्यांकडे नसतांही त्यांनीं जे उद्योग केले आहेत, जे ग्रंथ लिहून ठेविले आहेत, जें वर्चस्व राखिलें आहे, व जो बहुमान मिळविला आहे त्यास आज हजारों वर्षे झालीं तरी तें बरेंच चाललें आहे, यावरून त्यांची स्तुती करणें जरूर आहे.

कायद्यांत हमेशां किती फेरफार होतात हें आपण पाहातच आहों. हीच गोष्ट शास्त्रांची आहे. मनु बदलतो त्याप्रमाणें सर्व बदललें पाहिजे. रामायणाच्या काळीं किंवा कौरव पांडवांच्या काळीं ज्याप्रमाणें ब्राह्मण वागत होते त्याप्रमाणें मुसलमानी बादशाही हिंदुस्थानांत झाली तेव्हां वागत नव्हते हीत्यांची धूर्तता व शहाणपण लक्षांत ठेवण्या जोगें आहे. "ननीचो यवनात् परः" असा त्यांचा सिद्धांत होता तो मुसलमानांस कळला व ते ब्राम्हणांस मारूं झोडूं लागले व महारा प्रमाणें बिगारीस धरूं लागले तेव्हां ही त्यांनीं अल्लोपनिषधाची युक्ती केली व त्यांचा नीचपणा काढून टाकून त्यांस वेद प्रतिपाद्य केलें. व गुहांतून बसून राहणें सोडून देऊन व्यवहारमार्गांत शिरले. हें त्या काळांत योग्यच होतें. नाहीं तर कदाचित आजपर्यंत ब्राम्हणांचा माग मूसही न राहता. अस्तु तेंच मन्मंतर पुढील ब्राम्हणांचे दुराग्रहीपणानें व आळसानें पुन्हा कसें पालटलें तें पहा. वेदावर आ

लोकडे कांहीं आकट झाला आहे असें नाहीं. पण बाम्हणानीं मुसलमान दारीं आला कीं वेदघोषण बंद केलेंच व मुक्याचा अवतार घेतला. हा प्रकार जेथें वेदांच्या शाळा आहेत तेथें किंवा मंत्रजाग्रेंण अथवा वसंतपूजा होतात तेथें पाहावा. पण हा प्रकार हल्लींच्या मन्मंतरास चांगला नाहीं हें त्यांस अजून उमगत नाहीं.

शहाणपण हें वंशपरंपरेनें येत नसतें. तें शिकल्यानें व सारासार विच्यारानें येतें व हल्लींच बाम्हणसमुदायामध्यें या दोन्हीं गोष्टींची कमताई फार आहे. आणि पूर्वींचा मनु तर पालटला आहे. मग पूर्वजांनीं मिळविलेला थोरपणा आतांचे कालीं त्यांचा राहवा कसा? जुनीं भांडीं झिजून व फुटून जातात, जुनीं वस्त्रें फाटून व जीर्ण होऊन जातात, जुनें येणें मुदतीच्या कायद्यानें वुडून जातें, या उदाहरणाप्रमाणें पाहिलें म्हणजे आमच्या ब्राम्हणांच्या कीर्तीचा मागेंच लोप व्हावयाचा परंतु ती सदरहू प्रकारच्या जंगमवस्तूसारखी नव्हती. मोठयाशा किल्याप्रमाणें किंवा गढीप्रमाणें मजबूद होती म्हणून हजारो वर्षें टिकली परंतु दुःखाची गोष्ट ही कीं त्या पूर्वजांच्या पोटीं आम्ही जन्म घतलेल्या आलीकडील ब्राम्हणांनीं त्यावर नवी कामगिरी कांहीं करावयाची ती राहिली पण पहिलीचीच मरामत सुद्धां केली नाहीं. त्यामुळें ती जीर्ण होऊन फार डबघाईस आलेली आहे. आमच्या-जुन्या कीर्तीरूप गढीवर राजांनीं मोर्चा लाविला व आमच्या घरचेच आजपर्यंत यथेच्छ धान्य खाऊन पोसलेले आळसरूप उंदीर व निद्रारूप घुशी यांनीं त्या गढीस आंतून व बाहेरूनहि पोखरून पोकळ करून टाकिलें आहे व जीर्णोद्धाराची आशा तर हल्लींच्या चालत्या वर्तनावरून दुर्घट दिसते. मग कीर्तीचें संरक्षण होणार कसें? हा मोठा विच्यार आहे. मग परमेश्वर काय कृपा करील ती खरी.

आतां भक्तिमार्गानें, वेदांतानें, योग साधनानें, किंवा वेदाचीं जुनीं पुस्तकें घोकून पाठ म्हणत बसल्यानें ब्राम्हणांचें वैभव राहील असें दिसत नाहीं. आतां व्यवहार मार्गांत फार शिरलें पाहिजे. व राज्यकर्त्यांचा आणि लोकांचा रोख पाहून चाललें पाहिजे. व एकादा उदमी, किंवा सावकार धोरण पाहून आपलीं खतें पत्रें किंवा देणें घेणें नवें जुनें करून घेत असतो व त्या योगानें त्यास वूड न येतां व्यवहारास तेजी राहते त्याच सराफी धंद्याचें आतां आपणास अवलंबन केलें पाहिजे व मागून ही जर असा ओघ आहेच तर आपणास आतां तसें करण्यास कांहींच हरकत दिसत नाहीं. पूर्वजांनीं अल्लोपनिषध वेदांत घुसडविलें, वेदामध्यें कित्येक नवीन ऋचा व वर्ग घातले ते परिशिष्ट म्हणून प्रसिद्ध आहेत, युगायुगा करितां वेगळे वेगळे स्मृति शास्त्रांचे ग्रंथ आहेत. पुराणमतें तर एकाहून एक भिन्न आहेतच. शूद्रांचा आचार मार्ग वाढल्यास शूद्र कमलाकर, व यवनांचा वाढलयास यवनकमलाकर ग्रंथ होण्याची रूढ आहेच. एक ऋषी पुनर्विवाह करावा म्हणाले, एक नको म्हणाले; एकानीं जातिभेद गुणावर व कर्मावर ठरविला. दुसऱ्यांनीं जन्मावरच ठरविला. एकानीं सिंधू व ब्रम्हपुत्रा नदीच्या पलीकडे जाऊनये म्हणून निषेध ठरविला व भास्कराच्यार्यां सारख्यांनीं तो मोडून ग्रीस देशापावेतों गमन केलें व रघुराजासारख्यानीं इराणावर स्वारी केली. असे असे वज्रलेप दाखले असतां आपण अजाणत्या सारखे अनंताचे अनंत प्रतिबंध जे एकाकाळीं व एका देशीं कधीं कोणी मानिले नसतील व जे सर्वच एक समयावच्छेदें मानावयास अशक्यही आहेत त्या नियमांचें ओझें डोकीवर घेऊन व आळस आणि दुरभिमान यांचे कडीतोडे लेऊन आपण कीर्ति मिळविण्यास पाहातो तर हल्लींच्या काळांत ती कशी मिळेल? व तशानें आपली फजिती झाल्यावाचून कशी राहील?

मागील ओघानें शाहाणपणाचे बीजारोपणास ब्राम्हण हें क्षेत्र विशेष फलावह आहे असें शाळांतून वगैरे पाहातां स्पष्ट दिसून येतें तर ब्राम्हणांनीं या गोष्टीचा चांगला विच्यार करून व शिकून पूर्वापारची आपली प्रतिष्ठा राखावी. जुन्या काळीं पुष्कळांनीं पुष्कळच ग्रंथ केले व सायनाच्यार्यानीं वेदाचें भाष्य केलें. पण हल्लींचे काळांत तें समजून सांगण्यास ब्राम्हणांत कोणी पंडित मिळत नाहीं. आणि जे नीच मानिलेले, ज्यांच्या स्पर्शाचाही विटाळ ते म्लेंछदेशस्थ परम विख्यात व ज्ञानीशिरोमणि मिस्तर म्याक्समुलर साहेब शास्त्री, मि० वुइलसन साहेब पंडित, व डाक्टर हौग साहेब दीक्षित हे मिळतात. व यांनीं वेदादिकांचे आरशासारखे ग्रंथ करून ठेविले! अहाहा! काय अद्भुत गोष्ट ही! अस्तु हे सर्व प्रकार मनांत आणून ब्राम्हणांनीं व विशेषें आपले धर्मव्यवस्थापकांनीं हल्लींचे काळास अनुरूप असा मागील अनेक ग्रंथांवरून नवा एक सारग्रंथ करून तो प्रचारांत आणिला तर त्यांचें वैभव अजूनही अबाधित राहील व लोक त्यांस शहाणे समजून वंद्य मानितील व ही गोष्ट त्यांनीं अवश्य करावी व पुनर्विवाह, मोठेपणीं लग्नें, कन्याविक्रयनिषेध, देशपर्यटण, व जातिभेदविवेक यांस कांहीं मोकळिका द्याव्या. आतां या एकेक गोष्टीचें किती महत्व आहे तें पुढें सांगू.

GOOD CONDUCT OF AN OFFICIAL.

Time was when this territory (Berar) previous to its being ceded to the British Government was nothing but a scene of disorder and disquietude; when life and property were insecure; when Education was but little known; and when the faces of a large pagried men were not seen. But happily under the present Regime those times have gone by, and Education, the main source of all peace and happiness, having dawned upon the country, has removed all darkness and ignorance brooding over it. Those very men who had shown themselves to be alien to the idea of education, and friends to inhumanity, have not only parted with their sting so to speak with the advent of this Government, but have now proved to be zealous supporter of all social movement and promoters of the cause of education. In support of this statement we can adduce multi farious proofs. But fearing that it would be tedious and only encroaching upon our young reader's valuable time and attention we content ourselves by giving only one trusting that it will not fail to interest them.

A report reached us that the petty town called Peempulgaum Raja was on the 26th September 1869, visited by a Native Officer, the Tahasildar of the Mulkapoor Tolook who having examined the E. M. and H. E. Schools there, expressed great satisfaction on observing them in a thriving condition, and as an expression of his heart felt joy, greeted the pupils with the distribution of sweetmeat to the value of Rs. 5. After this was done, he betook himself to the task of lecturing the people present on the spot and pointing out the advantages accruing from education.

Now this functionary, who having spent the best portion of his life in His Highness the Nizam's Service and passed successively through various grades has at last, with his indefatigable exertions raised himself to his present post would never have called forth our admiration even if he had shown his total indifference to these things for the bare fact of his having been to the old School. But what most surprises is that he it is seen, has considered it his duty as it were, in addition to those al ready assigned him, to visit every seminary he might come accross his tour through the district and endeavour his best to stimulate the people to rally round the standard of education so generously raised in the country. We hope that such a praiseworthy conduct on the part of this time honored public Servant will not fail to commend itself to the attention of our most worthy and experienced Director of Public Instruction, under whose able management the Educational Department has been gradually assuming a healthful and vigorous form.

In conclusion, we exhort those Native Officers, not belonging to the Educational Department, to walk in the footsteps of this functionary and follow his example.

MISMANAGEMENT OF OUR FERRY BOAT.

*( Communicated )*

Our Akola friends are well aware that for the convenience of the Public a boat was ordered up with its necessary materials from Bombay in the commencement of the mensoon, and were set a going by the Local Fund Engineer. It was then ruled that passengers of all creeds and denominations wishing to be transported, must pay quarter of an anna as the boat-hire for each trip.

In conformity with this rule, the arrangements as hitherto made are in progress, but with profound regret we beg to assert that the peon, whose business it is to collect the boat hire, and the Chief Constable Kisonsing, and Vishnoopunt, the head Constable, have occasionally misused their authority in ordering down gentlemen who were already on board the boat to make room for Mr MadheorawHurry and Naro Umbriet the Naib Tuhsildar on the score of their being important Government Officials.

On Tuesday last about 6 P. M. Mr. Ballajee Keshew Head Accountant and Bulwant Govind Droftsman in the Railway Resident Engineers Office and other respectable Vukeels were on board the ferry boat anxious to get to the other side of the river. In the mean time Madheoraw Hurry Shirastedar with his Satellites was seen moving at rapid strides evidently indicating to catch the boat and get into it. The chief Constable Kisonsing, who walked abreast with him issued mandates to Mr. Ballajee and other Vukeels to quit the boat, which they refused to do on the ground of their being there long anteriour to the coming of the Shirastedar. This argument of their's being unpleasant and unwholesome the Chief Constable and the peon ordered them to get down, otherwise they would hold them by their arms and pull them down. If there were Eslamites in the place of poor Brahmins there would have been a battle faught on the banks of the Morna river; but happily, Mr. Ballajee and the Vakeels, to avoid any skirmish, left the boat and quietly waded through the river. Mr. Nicholetts who has the supervision of the boat will kindly enquire into the matter and punish the delinquents, and thus put a stop to the recurrence of all this pack of non sence.

## Local
## वऱ्हाड.

**अद्भुत गोष्ट**—अकोट तालुक्यांत मुंडगाव एथें गंगाई नावाची तीस वर्षांचे उमरीची एक स्त्री गरोदर होती. व तिचे दिवस पूर्ण होऊन पोटांत फार दुखत असल्या-मुळें व तळमळी मुळें ती अंगणांत आडा-बर रात्री वाऱ्यांत निजली होती. व दुःखानें कासावीस होऊन लोळत असतां न समजून ती आडांत पडली. आडाचा व्यास सा-रा दोन हातांचा असून पाण्यापावेतों त्याची सोळा हात खोली होती व पाणी सुमारें दोन पुरुष होते. अशा भयंकर आडांत अशा कठिण प्रसंगीं ती पडली असतां ईश्वरानें काय चमत्कार केला तो पहा—ती पाण्यांत पडल्याबरोबर सावध झाली व दोहो बाजूस दोन्ही हातांनीं धरून पाण्याचे वरच्या बाजूस कोनाड्यासारखे आडांत उतरण्याकरितां खोबळे होते त्यांत पाय ठेवून उभी राहिली व इतक्यांत बाळंत झाली. व पाहाते तों मुलगा झाला, मग त्यास दोहो हातांनीं धरून उभी राहिली व आपणास कोणी येऊन काढावें म्हणून शेजारणीस हाका मारूं लागली. तेव्हां लोक जमा झाले व तिला मुलासुद्धां त्यानीं काढिलें. बाळ बाळंतीण सुखरूप आहे. पोलिसाच्या डायरी वरून हे वर्तमान मे० दस्तुर नहिमनजी साहेब असिस्टंट कमिशनर यांनीं अगत्य पूर्वक आम्हांस दिलें या करितां आम्हीं त्यांचे आभार मानितों.

उमरावती, इलिचपूर, व वणी जिल्ह्याचे डिपुटी कमिशनर यांस क्रि० प्रो० क० ४४९ अ प्रमाणें अशिष्टंट सेशन जडजाचे आधिकार दिले.

मि० एच० सी० फाउलर यांस वऱ्हाडांत निजाम सरकारच्या टांपाचे सुपरइंटेंडंट नेमिलें.

अकोला.

अकोला आणि बुलढाणें ह्या जिल्ह्यांतील धर्मार्थ दवाखान्यास ज्या ज्या लोकांनीं वर्गणी दिली त्या लोकांस आभार, प्रदर्शित करावे असा हुकूम मेहेरबान रेसिडें

साहेब यांजकडून मेहेरबान कमिशनर साहेब यांस आला आहे.

यास्तव त्या हुकुमाअन्वयें मेहेरबान हणमंत खंडेराव तहशिलदार बाळापूर, मेहेरबान हणमंतराव देशमुख बाळापूर, व अकोलें, खामगांव, नांदुरे, शेगांव आणि जळगांव येथील लोकांस आभारपत्रें पाठविलीं आहेत.

कालपासून येथें पर्जन्य म्हणण्यासारखा नसून नदीस आज पाणी मोठें आलें आहे. सर्व पावसाळ्यांत एवढें आलें नव्हतें. आतां पाऊस लवकर उघडेल तर फार चांगला.

येथील नदीवर जी बोट आहे तिच्या गैरव्यवस्थेविषयीं आमच्या कित्येक मित्रांकडून आम्हांस कित्येक वेळां मजकूर कळवावरून त्याविषयीं आज इंग्लिश भागांत थोडा मजकूर बातमीदाराकडून आलेला लिहिला आहे. तसें असेल तर अधिकाऱ्यांनीं जरूर त्याकडे लक्ष द्यावें. बोटींत बसलेल्या थोर थोर मनुष्यांस उतरावें आणि आपले आवडि‍ते लोकांस मात्र बसवावें असें होऊ लागलें तर मग तो केवळ गैरअब्रूचा बाजार होईल. व कोणा भल्या मनुष्याची कोणे वेळेस अब्रू जाईल याविषयीं सर्वकाळ धाक राहील सबब असें नसावें. व तो बंदोबस्त न होईल तर बिलकूल बोट नसेल ती बरी. कारण ती असल्यापासून उपयोग थोडाच घडतो. म्हणजे छातीच्या खालीं पाणी असल्यास मात्र ती चालवितात व पाणी अधिक झालें म्हणजे बंद करितात. आणि बोट चालते तितक्या पाण्यांतून गरीबगुरीब शेकडो लोक तर पायउतारानेंच जातात तेव्हां बहुतांशीं ती असून नसल्यासारखीच आहे. व शिवाय तीपासून सदरीं लिहिलेला गैरअब्रूचा धाक आहे.

मि० निकोलिट साहेब यांस फर्स्टक्लास माजिस्त्रेटचा अधिकार मिळाला.

शेट गंगाधर जोरावरमल साहू मालेगावाहून परत आले. अफू बाळगल्याचा व विकल्याचा त्याचे घरचा मुकदमा फैसल झाला. शेटजीस एक रात्र जामीन न घेतां पोलिसाकडे ठेविलें होतें हे मात्र वाईट झालें. बाकी त्यांवर कांहींच दोष नव्हता. त्यांचा गुमास्ता राघोबा नाईक यास १०० रुपये व पनालाल यास ५० रुपये दंड झाला.

डिपुटी कमिशनर साहेबांकडे सेशन चाललें त्यावेळीं असेसर जयराम डांगे हा मनुष्य हजर नव्हता त्यावरून त्यास २५ रुपये दंड झाला.

नदींत धाकट्या धरणावरून येक मुसलमान मनुष्य घसरून वाहवला व मरण पावला-

शेट गुलाबराय गोंविंदराम साहू यांनीं मेसर्स चारनाक, रीड, व मिचल रेलवे कंट्राक्टर यांजवर मागें १६००० रुपये घेणें काढिलें होतें व वर्तमान पत्रांतून नोटिस दिली होती. त्याबद्दल त्यांनीं हल्लीं सदरहु कंट्राक्टर यांवर दिवाणींत दावा केला आहे व प्रतिवादीनीं लढण्याकरितां मुंबईहून सालिसिटर आणिले आहेत.

### पोलिसाचा जुलूम.

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि० वि० कांहीं दिवसांपूर्वी धारेस मिठाच्या प्रकर्णीं कांहीं जुलुमाचा प्रकार झाला तो सर्वांस आणि विशेषें करून पोलिसच्या लोकांस माहीत व्हावा याकरितां, आपल्या येत्या अंकांत या चार ओळींस जागा द्याल अशी आशा आहे.

येथें दोघां चौघानीं मिळून निरी येथून कांहीं मीठ विकत आणिलें आणि तें बाजारांत विकावयास नेलें ही खबर येथील माळी पोलीस हे० का० यास कळतांच त्यानें त्या लोकांस धमक्या देऊन त्यांच्या घरांचे झाडे घेतले, मीठ मोजून पोलीस चावडींत आणिलें आणि तुम्हांस दंड होईल, कैद होईल अशी धास्ती घातली. ते बिचारे गरीब लोक, त्या पाषाणहृदयी यमदूताचे वाग्बाणें ऐकून घाबरले आणि मध्यस्थी घालून त्या दुष्ट दूताचा तळीराम गार करावा असा विचार करून सर्वांनीं मिळून रुपये ५० त्यास लांच म्हणून दिले. परंतु पातकाचा घडा केव्हां तरी फुटतोच. हा प्रकार झाल्यावर कष्टम कडील कोणी साहेब येऊन, त्यानें सदरील लोकांवर कोणत्याहि प्रकारें हें मीठ आणिल्याबद्दल आरोप येत नाहीं, असें बोलतांच त्या लोकांनीं पो० सु० साहेब यांजकडे हेड. का० यानें आम्हांपासून जुलमानें रुपये घेतल्याबद्दल फिर्याद केली. त्याची चौकशी होऊन साक्षीपुरावेही बरोबर जमले असून त्या घाशीरामास बिनभाड्याच्या घरांत जागा मिळावयाची; परंतु फक्त तो कामावरून बडतर्फच जाहला. यांत काय इंगीत असेल तें असो. मात्र इतकेंच कीं इकडील लोक अज्ञानावस्थेंत असल्या मुळें पोलिस लोकांचा मोगलाई बरताव अद्याप गेला नाहीं हें खचित आहे. कळावें तारीख १० सपटंबर मु० धार० तालुके चिखली.

---

रा• रा• वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

विनंती विशेष—खालील च्यार ओळी मजकुरास आपण आपले पत्रांत जागा द्यावी.

मी फिरत फिरत परतवाडे मुक्कामीं आलो तेथें गेल्यावर दिवाणी कोर्ट व स्मालकाज कोर्ट पाहण्यास गेलो होतों. स्मालकाज कोर्टांत गेल्यावर तेथें एक कज्या चालला होता त्यांत प्रतिवादी सुबोधप्रकाशचे म्यानेजर व एडिटर हे होते व यांतील वादी त्यांतील पूर्वींचा म्यानेजर होता आणि कोणी आपली तनखा घेण्याबद्दल फिर्याद केली होती. प्रतिवादी कोर्टांत आल्यानंतर अव्वल प्रतिवादीनें सर्व दाव्याप्रमाणें देणें कबूल केलें आणि दुयम प्रतिवादीनें आपण देणेदार नसल्याबद्दल तक्रारी कळविल्या

१. पहिली तक्रार अशी कीं वादी हा पूर्वी म्यानेजर असून त्यानें हिशेबांत घोटाळा केला व त्याजबदल अव्वल प्रतिवादीनें कबूल केलें कीं वादीनें बिलकुल घोटाळा केला नसून सर्व काम माझे हुकुमानें केलें आहे.

२. दुसरी तक्रार अशी कीं आम्हास हिशेब दिल्हा नाहीं त्याजवर ही अव्वल प्रतिवादीनें असें कबूल केलें कीं सर्व हिशेब आम्ही समजून घेतला आहे.

सदरील दोन्ही तक्रारीचा निकाल झाल्यानंतर अखेर प्रतिवादीनें अशी तक्रार केली कीं खर्च तरी मजवर पडूंनये तीही गोष्ट कोर्टानें अमान्य केली आणि प्रतिवादीचेविरुद्ध हुकुमनामा दिला. नंतर वादीनें जप्तीबद्दल वारंट मागितल्या वेळीं प्रतिवादीनें रुपये दाखल केले.

वर्तमानपत्रकर्ते महाराज यांचे छापखान्याचें नाव तर सुबोधप्रकाश आहे. याचा अर्थ सु म्हणजे चांगला, बोधक म्हणजे उपदेश करणारा हा आहे. असे लोकांनीं काय हो अशीं कामें करावीं? या पत्रकर्त्यानें जर अशीं कामें करावी तर कु बोध कर्ते यांणीं काय करावें?

वरील दुसरे प्रतिवादीनें सरकारच्या वारंटाबद्दल एक रुपया आठआणे १८८व नाजराचे फीबद्दल दाहाआणे. येकूण. दोन रुपये दोन आणे नुकसान केलें हें त्याचे वरील कृत्यास फार वाईट जाहलें यांचें मजला फार दुःख वाटतें. कळावें. ता० २५ माहे सपटंबर सन १८६९ इसवी.

एक फिरस्ता

---

## Epitome of News

## वर्तमानसार.

पर्शियन गल्फ म्हणजे इराणी अखात यांत कोणी मुसलमान जातीचे लोक कांहीं गडबड करित आहेत.

पेशावराकडे महामारीचा उपद्रव सुरू आहे. ता० २३ सपटंबर पावेतों शहरांत १३० युरोपियन व १००० नेटिव मरण पावले.

मि० मोरोबा कानोबा यांनीं मुंबईच्या स्मालकाज कोर्टांत व पोलिस कोर्टांतही वकीलीचें काम करण्याची परवानगी मिळविली.

महामारीवर लिकर अमोनिया हे औषध चांगलें लागू होतें असें एका युरोपियन डाक्टरानीं २।३ उदाहरणावरून ठरविलें आहे.

लश्करच्या भाकरी तयार करण्याचे कारखान्याकडे बैलांचा उपयोग करितात त्या ऐवजीं वाफेचा ऊपयोग करीत जावा असा हिंदुस्थान सरकारचा, बिच्यार झाला आहे.

मस्कताहून इराणी आखातांतून धान्य मुंबईस पुष्कळ येऊं लागलें आहे. आणि तेथून तें गुजराथेकडे रवाना होत आहे.

सिंध कराचीस या महिन्यापासून शिंध अफीशिल ग्याझेट या नावाचें, सरकारी वर्तमानपत्र निघूं लागलें आहे.

वजनें व मापें नव्या प्रकारचीं करण्याविषयीं विलायत सरकारची पसंती झाल्याप्रमाणें कायदा होत आहे.

राणी साहेबांचे चिरंजीव हिंदुस्थानांत येणार व अग्र्यास मोठा दरबार होणार अशी बातमी होती ती आतांशी थंडी पडली आहे. व राजपुत्र आले तरी तेथें दरबार होणार नाहीं असें म्हणतात.

विलायतेची डाक घेऊन सुएझ एथून निघालेली आगबोट कर्नाटक असें जिला नाव होतें ती वाटेंत फुटून बुडाली. सुएझ पासून आलीकडे ६५ कोसांवर शादवान नावाचें बेट आहे तेथें हा अनर्थ गुजरला. १५ युरोपियन व १५ नेटिव गृहस्थ तिजवर होते त्यांचा पत्ता नाहीं. या आगबोटीची किंमत सात लक्षांची आहे व तिजवर सुमारें साडे तीन लक्षांचा माल होता असें कळतें. कागदपत्रवगैरे कांहींच हातीं लागलें नाहीं व मनुष्यें मरणपावलीं या बद्दल वाईट वाटतें. या आगबोटीवर १६० खलाशी लोकांची टोळी होती तिचें काय झालें तेंही अजून कळलें नाहीं.

आनरबल एलिस साहेब आनरबल टेलर साहेबाचे जागेवर हिंदुस्थान सरकारचे कौसलांत मेंबर होते त्या जागेचा त्यांनीं राजिनामा दिला. व आनरबल टेंपल साहेब कौसलर यांचे जागेवर त्यांची नेमणूक झाली.

सरकारी अफूशिवाय लोकांची खासगी अफू टपाल मार्गे नेऊनये. असा सरकारानें ठराव केला आहे.

कलकत्यांतील बंगाली पत्राचे विद्वान एडिटर बाबु गिरिश चंद्र घोस मरण पावले.

---

## जाहिरखबरा.

**नो**टिस—शेख रहिमू वल्लद शेख मनंग मुक्काम इसापूर तालुके अकोट यास कळावें कीं, तूं आम्हास शेत दिलेस त्याबद्दल पूर्णा पाटील मार्फत ३५ रुपये तुला दिले व गुदस्तसालचा साराही २७८२ दिला. असें असतां सदहू शेत आमचे नावावर अजून करून देत नाहींस. तर आठ दिवसांचे आंत आमचें नांवचें करून द्यावें नाहींपेक्षां तुजवर फिर्याद करून खर्चासुद्धां भरून घेऊ कळावें. ता० १ आक्टोबर १८६९ इ०

(सही) मनुसिंग वल्लद बलदेवशिंग.

---

**नो**टिस—धर्मा नाईक वणजारी वस्ती मौजे पाथर्डी परगणे घाटबोरी तालुके मेहकर यास नोटिस देण्यात येते कीं, तुम्हांकडे देऊळगाव साकरशा येथील श्रीराम शाळिग्राम यादुकानचें घेणें आहे तें—

८॥. खातें बाकी मिती कार्तीक शुद्ध १ संवत १९२३ रुपये साडे आठ.

९५।. भाड्या पैकीं बाकी सव्वा पंचावन रुपये मिती वैशाख शुद्ध ५ संवत १९२३

४७। व्याजा बदल रुपये सवासतेचाळीस.

---

१११.

येणे प्रमाणे एकशें अकरा रुपये हीं नोटीस पोंचल्यापासून आठदिवसाचे आंत आणून नोटिसीचे खर्चासुद्धां द्यावे नाहीपेक्षां दिवाणी कोर्टा मार्फत वसूल करण्याची तजवीज होईल कळावें तारीख २२ सपटंबर सन १८६९ इसवी.

(सही) श्रीराम शाळिग्राम दस्तुर हिरालालजी.

---

**नो**टिस— म्हसू वल्लद कडूजी पाटील मौजे वाकदेव परगणे घाटबोरी तालुके मेहेकर यांस नोटीस देण्यांत येते कीं, तुम्हांकडे देऊळगाव साकरशा येथील श्रीराम शाळिग्राम यादुकानचें देणें मुदल रुपये २५॥= पंचवीस दाहाआणें व शिवाय व्याज संवत १९२३ पासून आहे तें ही नोटिस पावल्या पासून पंधरा दिवसांचे आंत आणून देणें नाहींपेक्षां दिवाणी कोर्टा मार्फत वसूल करण्याची तजवीज होईल. कळावें तारीख २२ सटटंबर सन १८६९ इ०

(सही) श्रीराम शाळिग्राम दस्तुर हिरालालजी.

नोटिस—राघोजी पाटील लठार मौजे वाकदेव परगणें घाटबोरी तालुके मेहेकर यास देण्यांत येतेकीं, तुम्हांकडे देउळगाव साकरशा येथील श्रीरामशाळिग्राम दुकानचें घेणें मुद्दल रुपये साडेशायशीं८६॥ व सदरहु रकमचें संवत१९२३ पासून दुहोऱ्या प्रमाणे व्याज आहे त्याची फेड ही नोटिस पावल्या पासून नोटिसीचे खर्चां सुद्धा आठ दिवसांचे आंत करावी. नाहीं पेक्षा दिवाणी मार्फत कायदेशीर तजवीज करून वसूल करण्यांत येईल हें कळावें तारीख २२ सपटेंबर सन १८६९ इसवी

(सही) श्रीराम शाळिग्राम दस्तुर हिरालालजी.

---

नोटिस—राघोजी वलद कडूजी पाटील मौजे वाकदेव परगणे घाटबोरी तालुके मेहेकर यांस कळविण्यात येते कीं, तुम्हीं देउळगाव साकरशा येथील श्रीराम शाळिग्रामचे दुकानची खातेबाकी मुद्दल एकशें सत्याणव रुपये १९७ व संवत१९२३ पासून त्यांचे दुहोत्र्या प्रमाणें व्याज देणें आहां तरी ही नोटीस पावल्यापासून पंधरा-दिवसाचे आंत इच्या खर्चा सुद्धां सर्व रुपयांचा उलगडा करावा न केल्यास दिवाणी कोर्ट मार्फत वसूल करण्या विषयीं कायदेशीर तजवीज केली जाईल कळावें तारीख २१ सपटेंबर सन १८६९ इसवी.

(सही) श्रीराम शाळिग्राम दस्तुर हिरालजी.

---

नोटिस—कर्णाजी वलद बावुजी पाटील मौजे चितोड तालुके बाळापूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्हांकडे आमची खातेबाकी मुद्दल ४५८२ पंचेचाळीस रुपये दोन आणें व फालगुन वद्य १० संवत १९२५ पासून दरमाहा दर रुपायास अर्धाआणा प्रमाणें व्याज येणें आहे तरी ही नोटिस पोंचले तारखे पासून नोटिसीचे खर्चासुद्धां सर्व रुपयांचा वसूल आठ दिवसांचे आंत देणें नाहींपेक्षां दिवाणी मार्फत तजवीज करण्यांत येईल कळावें तारीख २१ सपटेंबर सन १८६९ इसवी

(सही) टिकाराम पुरणमल दस्तुर खुद.

---

नोटिस—पुंजाजी भोंकरे दुर्गबोरीकर हल्लीं वस्ती गडकणके परगणें घाटबोरी तालुके मेहेकर यांस नोटीस देण्यांत येते-कीं तुम्हांकडे देऊळगाव साकरशा येथील श्रीराम शाळिग्राम दुकानचें मुद्दल रुपये २२॥ साडेबावीस व संवत १९२२ पासून दुहोल्या प्रमाणें व्याज घेणें आहे तरी या नोटिसीचे खर्चासुद्धां ही पावल्या पासून पंधरा दिवसाचे आंत उलगडा करावा कळावें. नाहींपेक्षां दिवाणी कोर्टा मार्फत वसूल करण्याची तजवीज करण्यांत येईल हें समजावें. तारीख २२ सपटेंबर १८६९ इ०

(सही) श्रीराम शाळिग्राम दस्तुर हिरालालजी.

---

नोटिस—बापुजी व लटूजी व हंबीरजी व दर्याजी वलद बेंडाजी गांवडे मुकदम मौजे पोटी परगणें खडी धामणी तालुके वाशिम यांस खालीं सही करणार याजकडून ऐसी नोटिस देतोंकीं तुमचे बापाकडेस आमचे खालीं लिहिल्या प्रमाणें कर्ज नगदी रुपये व माल वगैरे घेणें असून तुमचे तीर्थरूपानीं आमचे दुकानीं येऊन हिशोब वगैरे करून वहीवर सही करून दिली असून तो हल्लीं तुमचा बाप मयत झाला त्याचे योग्य वारस तुम्ही असून त्याची जिनगीही तुमचे ताब्यांत आली आहे व हें देणें तुम्हांस देण्याविषयीं च्यार लोकांसमक्ष कितीक वेळा मागणें केले असता तुम्ही देण्यास कबूल असून करार करीत गेले परंतु आजपर्यंत दिले नाहीं तुम्हांकडे घेणे आहे ते बि तपसील-

२६३॥।. नगदी रुपये ऐन १६४ व व्याज दर शेकडा २ रुपये प्रमाणें ९९॥।

७६. तुरी मण ऐन ९ मण मंगरूळ पायली सवाई प्रमाणें वाढ दोन ४॥. साडेच्यार मण अगर त्याचे किंमती बद्दल रुपये ७६

१२६॥।. जवारी मण ऐन १३ मंगरूळ पायली वाढ सवाई प्रमाणें दोन मण ६॥ अगर किंमत रुपये १२६॥।.

४६५॥.

सदरहू प्रमाणे तुमचे कडून घेणें आहे तें या नोटिसीचे तारिखे पासून पंधरा दिवसांचे आंत आमचे आम्हांस द्यावें आणि आमची रसीद घ्यावी याप्रमाणें तुम्ही न कराल तर तुम्हांवर योग्य कोडतांत फिर्याद केली जाईल व खर्चासमेत व नोटिसीचे खर्चासुद्धां तुम्हाकडून रुपये घेतले जातील व या सिवाय आणिक जितके दिवस तुम्ही रुपये देण्यास लावाल तितके दिवसाचे व्याज वाढत जाईल कळावें तारिख २९ माहे सपटेंबर सन १८६९ इसवी मुक्काम अकोलें.

(सही) बाळकृष्ण सोनाजी कळवे दुकान कसबे मंगरूळपीर तालुके वाशिम यांजकडून वहिवाटदार खुद्द भाऊ रामकृष्ण सोनाजी कळवे दस्तुर खुद्द.

---

नोटिस—अमृता वलद बहिरजी पाटील मौजे मांडवे तालुके बाळापूर यास प्रेमसुख नथमल मारवाडी दुकान देऊळगांव साकरशा तालुके मेहेकर याजकडून देण्यांत येते कीं, आम्ही ता० ७ अगष्ट सन १८६९ इसवीचे वऱ्हाडसमाचारांत तुम्ही व तुमचा भाऊ हनुमंता वलद बहिरजी पाटील या उभयतांचे नांवें नोटिस दिली आहे कारण तुम्ही उभयतां बंधु विभक्त नसून एकत्रच रहात असल्या कारणानें जे सवांत १९१६ पासून शेकडो रुपये देणें घेणें झालें तें उभयतांचे हस्तें झालें आहे. व तुमचा वडील बंधु हनुमंता कारभारी असून त्यास लिहिता येत होतें सबब खात्यावर रुजू सही त्याची झाली आहे असें असतां नोटिशीचा जबाब तुह्मी एकटयानें लिहून देण्यानें जबाबदारीपासून मोकळे होण्यास पाहता परंतु अशानें म्हणजे तुम्हावरील देण्याची जबाबदारी चुकते असें नाहीं हें खुप समजावें. आणि ही नोटिस पोंचल्या पासून आठ दिवसांचे आंत पहिले व या नोटिशीचे खर्चासुद्धां रुपयांचा उलगडा करावा नाहींपेक्षां दिवाणी कोर्टामार्फत फेड करून घेण्यांत येईल कळावें. तारीख १२ सपटेंबर सन १८६९ इसवी.

(सही) प्रेमसुख नथमल दस्तुर खुद्द.

---

नोटिस—सर्वत्रांस कळविण्यासाठीं देण्यांत येते कीं, नाना वलद भगवान पाटील मौजे वर्ण परगणें माटरगांव तालुके चिखली जिल्हा बुलढाणें याजवर तहशिलदार कोर्टांत मुकदमा नंबर ४९०।४९१ सन १८६९ पैकीं हुकुमनामे दोन मिळविले आहेत आणि दोन्ही हुकुमनाम्याचे रुपये ९२४।. व शिवाय कोर्ट खर्च घेणें विशी ठराव झाला आहे. याजकरितां या नोटिशीनें इतकें कळविण्यांत येते कीं, आम्ही हुकुमनामे मिळविल्या कारणानें तो आपली जिनगी लबाडीनें ह्मणजे आह्मास पैसा न मिळावा या हेतूनें गहाण किंवा विक्री करील तर ती घेणारांनीं विचार करून घ्यावी. व तसेंच देणार नाना पाटील याणीही विचार करून द्यावी कळावें. तारीख २४ माहे सपटेंबर सन १८६९. इसवी मुकाम चिखली.

(सही)जेठमल बालमुकुंद मारवाडी द०खुद्द

---

नोटिस—नथमल किसनचंद साहू दुकान नांदुरे याणीं ता० १८ माहे सपटेंबर सन १८६९ इसवीचे वऱ्हाडसमाचारांत नोटिस दिली तीस जबाब आमच्या वहींचा दाखला पहातां सुग्यानमल शौकमल साहू यांचें पेवांत आमची जवारी खंडया १२॥ तिचा ठराव असा आहे कीं, वर मोजून द्यावी त्याप्रमाणें दिल्यास आम्ही घेण्यास कबूल आहों कळावें. ता० २५ माहे सपटेंबर १८६९ इ०

(सही) प्रयागदास दमानी दस्तुर तुळशीराम.

---

नोटिस—भिकासा विठ्ठलसा लाड महाजन राहणार पेठ देऊळगांवराजा याशी खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, तुम्हो आह्मापासून कर्ज रुपये ४२ याशी व्याज दरमहा दरशेकडा २ रुपयेप्रमाणें कार्तीक वद्य ३ शके १७९० इसवी रोजीं दर आठवडयास २ रुपये देण्याचे करारानें घेतले त्याप्रमाणें तुम्ही तीन आठवडे मात्र रुपये दिले. तेव्हांपासून आम्ही तुह्मास वारंवार तगादा करीत आलो परंतु अद्याप बाकीची फेड केली नाहीं. आजपर्यंत व्याजमुद्दल मिळून रुपये ३९ झाले ते ही नोटिस पावल्याचे तारखेपासून आठ दिवसांत आमचें दुकानीं आणून द्यावे न दिल्यास फिर्याद करून नोटिशीचे खर्चासुद्धां रुपये घेण्यांत येतील कळावें. ता० २४ सपटेंबर १८६९.

(सही) गणेशदास नानूराम दस्तुर खुद्द दुकान पेठ देऊळगांवराजा.

---

नोटिस—सकुमर्द लहानू गवळी राहणार पेठ देऊळगावराजा ईस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, तूं सरकीबद्दल पंधरा दिवसांचे करारानें ६७ रुपयांची चिटी मिती जेष्ठ वद्य ८ शके १७९० इसवी रोजीं दिली होती त्यापैकीं ३४ रुपये मात्र आणून दिले बाकीं ३३ रुपयांबद्दल वारंवार तगादा करीत आलो परंतु अद्याप फेड केली नाहींस. व आज पर्यंत बाकीचे व्याज व मुदलासुद्धां ४३॥ रुपये झाले ते ही नोटिस पावल्याचे तारखे पासून १५ दिवसाचे आंत आमचें दुकानीं आणून द्यावे न दिल्यास फिर्याद करून नोटिशीचे व फिर्यादीचे खर्चासुद्धां व व्याजासुद्धा रुपये घेण्यांत येतील कळावें. ता० २४ सपटेंबर १८६९ इसवी.

(सही) गणेशदास नानुराम द० खु० दुकान पेठ देऊळगांवराजा.

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अकटोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केलें त्यास दोन वर्षे पुरीं झालीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं-

**वऱ्हाडसमाचाराचे मालक.**

---

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धआणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

**वऱ्हाडसमाचाराचे मालक.**

---

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present and past years, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

## नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत मार्गेच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ८६ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल. व. स. म्यानेजर.

---

| किमतीचे ठराव. | रु. | अ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास··· | ···६ | ० |
| साल अखेर ··· ··· | ···७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ··· | ···३ | ८ |
| एक अंकास ··· ··· | | ५ |
| फुटकळ ··· ··· | ···० | ५ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५१ आठवडयांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

---

**नोटिसा वगैरे छापण्याचे दर.**

१० ओळी पर्यंत··· ··· ··· १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छापून प्र० केलें

# वऱ्हाडसमाचार.

THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL. IV AKOLA :—SATURDAY EVENING, OCTOBER 16, 1869 NO. 41

पुस्तक ४ अकोला, शनिवार सायंकाळ तारीख १६ माहे आक्टोबर सन १८६९ इ० अंक४१

## उमरावतीचें बोर्डिंग क्लब.

उमरावतीस कांपिटिटिव परीक्षेकरितां जीं मुलें व मास्तर तेथें पुढील आठवड्या पासून सुमार पंधरा दिवस जमतील त्यांस राहाण्याची, उष्णोदकाच्या स्नानाची, व दुवक्ता भोजनाची उत्तम सोय धर्मपरायण बुद्धीनें उमरावतीच्या परोपकारी व मेहनती लोकांनीं केली आहे त्याविषयींची त्यांची जाहिरात खालीं लिहिली आहे ती पाहून कोणासही समाधान वाटल्यावाचून राहाणार नाहीं.

अशा कामीं आपलें औदार्य दाखविणें फार चांगलें व कीर्तीचें आहे. आणि वऱ्हाडांत अशा कामीं उमरावतीकरांचें वर्चस्व बरेंच दिसतें. पहिलीं दोन वर्षे ही परीक्षा अकोल्यास झाली तेव्हां मुलांचे व मास्तरांचे फार हाल झाले याचें कारण तेव्हां अकोल्याची स्थिती आतां इतकी सुधारल्या पंथांत नव्हती; व असें जरी आहे तरी अकोल्यास या वर्षीं ही परीक्षा झाली असती तर उमरावतीप्रमाणें उत्तम सोय झाली असती किंवा नाहीं याविषयीं आम्हांस संशय आहे. व ती गोष्ट मुग्धच राहिली हें एक पक्षी बरें झालें. तथापि पुढल्या वर्षी याचा उलगडा होईलच. उमरावतीकरांनीं गुदस्त सालीं व त्याहून काकण भर जास्त चालू सालीं बेत केला हा त्यांस भूषणार्ह आहे. व त्यांचें औदार्य असेंच परोपरीच्या उपयुक्त कामीं खर्ची पडो व त्यायोगें त्यांची कीर्ती होवो व अकोल्याचे लोकांसही तशी सुस्थिती आणि सद्बुद्धी परमेश्वर देवो असें आम्हीं इच्छितों.

### जाहिरात.

१. कांपिटिटिव परिक्षकरितां जीं मुलें व मास्तर उमरावतीस चालू महिन्यांत येणार त्यांच्या रहाण्याच्या व भोजनाच्या वगैरे तजविजीबाबद माहिती व नियम.

**उतरण्याच्या जागा आणि मास्तर व मुलें किती समावतील त्याविषयीं.**

| | |
|---|---|
| १ आंबाचे देवळा समोरील नगारखाना | ५० |
| १ बालाजीचे मंदिरामागें बापुसाहेबांचे घराजवळील सोपा. | २५ |
| १ लायब्ररी खालील व मागील शेट जमनादास यांची हवेली भुसार गल्लींत. | १०० |
| १ दाण्याच्या ओळींत कापशाचा वाडा ज्या ठिकाणीं डिपुटी इन्स्पेक्टर रहात होते तेथें. | ३० |
| १ सबजी बाजारांत लालजी सोह व यांची हवेली सत्यप्रकाश छापखान्याजवळ. | ७५ |
| * १ हिंदुस्थानी मुलींच्या शाळेचें मकाण याद अली साहेब यांचे, तारखेडयांत. | ३० |

* १ हीजागा मुसलमान लोकांच्या मुलां करितां मुदाम तेथें सर्व सोयी असल्या वरून रहाण्यास व जेवण्यास योजिली आहे स्वतंत्र स्वयंपाक वगैरे करवू इच्छिणाऱ्या मास्तरांस जागा.

१ नंबर २ इंग्रजी मराठी शाळा वरील एक पांचचार माणसें रहाण्या जोगी जागा बुधवारांत.

१ गांवाबाहेर कापसाच्या तकाजवळील दोन इमारती नवीन बांधलेल्या १० पासून २० माणसें एकएकींत रहाण्या जोग्या.

१ कापशाच्या वाडा येथें ३० मंडळी राहून स्वतंत्रही स्वयंपाक करण्यास जागा आहे.

बोर्डिंग हाऊस (मुलांस व मास्तरांस जेवणाचें ठिकाण .)— आंबेचे देवळांत व तारखेडयांत याद अली साहेबांचे घरीं.

**स्नानाची जागा**:—आंबेच्या देवळा जवळ नाल्याचे काठीं.

२ खालीं लिहिल्या नमुन्या प्रमाणें प्रत्येक मास्तरानें आपलीं व आपल्या कडून जेवावयास येणारे मुलांचीं नांवें भरून तो नमुना रा० रा० केशवराव सेक्रटारी यांचे हपिसांत आंबेच्या देवळांत तारीख १९ माहे आक्टोबर १८६९ चे आंत दाखल करावा.

| नंबर. | मुलांचें व मास्तरांचें नांव. | ज्ञात. | किती दिवस जेवण्यास येतील. |
|---|---|---|---|
| १ | गणेश भगवंत. | ब्राह्मण. | तारीख १९ पासून ता० ३० पावेतों दोन्हीं वेळां. |

टीप—जे मास्तर हा नमुना भरून पाठविण्यास हयगय करतील त्यांच्या मुलांस जेवणास घेण्याची अडचण पडेल.

३. परिक्षकीरतां पर ठिकाणांहून आलेल्या मुलांपासून व मास्तरांपासून जेवण्याचा खर्च घेतला जाणार नाहीं. याशिवाय इतर कोणा मनुष्यास प्रेसिडेंट म्यानेजिंग कमेटी यांच्या हुकुमाखेरीज जेवणास घेतलें जाणार नाहीं.

४. जेवणाची सोय तारीख १८ सायंकाळ पासून तारीख ३० पावेतों मात्र होईल. आणि स्नानाची सोय तारीख १९ चे प्रात:काळ पासून होईल.

५. प्रात:काळीं सूर्य उगवल्यापासून तों नऊ वाजे पावेतों स्नानास पाणी मुक्रर केलेल्या जागीं मिळण्याची तजवीज राहील. सात वाजतां पात्रें टाकलीं जातील साडेसातपासून तों साडे आठ पावेतों सर्व मुलें व मास्तर जेवण गृहांत घेतलीं जातील. साडे आठ वाजतां जेवणास बसण्याचा बेत होईल. म्हणजे साडे नऊ वाजतां मुलांस परिक्षेस जाण्यास सापडेल सायंकाळीं सात वाजतां भोजनास बसण्याचा बेत होईल. सहा वाजतां सर्व मुलानीं व मास्तरांनीं आलें पाहिजे.

६. भोजन संबंधीं अगर इतर कोणच्याही प्रकारची अव्यवस्था आहे अशी तक्रार कोणाची असेल तर त्यानें आपल्या शाळेच्या मास्तरास सांगावें म्हणजे ते योग्य दिसल्यास सेक्रटरी रा० रा० केशव लक्ष्मण यांस कळवितील.

७. मुलांनीं भोजन गृहांत आल्यावर कल्हा खोडी वगैरे करूं नये. या बद्दल व त्यांस मुक्रर केलेल्या वेळच्या वेळीं भोजन गृहांत जेवणास आणण्याबद्दल जबाबदारी मास्तर लोकांकडे आहे.

८. कोणास कांहीं विशेष लागल्यास त्यानीं सेक्रटरी यांजकडेस कळवावें.

केशवराव सेक्रटारी
बोर्डिंग क्लब हाऊस
उमरावती.

## कापसाकडे सरकारचें विशेष लक्ष.

अतितृष्णा करण्यानें कोणाचें हित झालें असें आढळणें कठीण दिसतें. द्रव्यरूप समद्रामध्यें बुडालेल्या मांचेस्टर वगैरे शहरच्या व्यापारी लोकांस हल्लींच्या काळीं अतितृष्णा उत्पन्न झाली आहे असें दिसतें, व त्या त्यांच्या तृष्णेस आमचें सरकार दिवसेंदिवस अधिकाधिक बळकटी देत आहे. पहा कांहीं वर्षांपूर्वी अमेरिका व इंग्लंड या दोन राज्यांत कांहीं तंटा उत्पन्न होऊन मोठें युद्ध होऊं लागलें. त्या लढाईच्या कारणानें अमेरिकेंतून इंग्लंडास जो कापसाचा पुरावा मिळत असे तो बंद झाला, तेव्हा अर्थातच इंग्लंडच्या मोठमोठ्या कारागिरीच्या शहरांतील व्यापारी लोकांस मोठे वाईट दिवस आले. इंग्लंड देश हा कलाकौशल्य, विद्या व दुसरे पाहिजे तितके अमोल्य गुण यांत कितीही श्रेष्ठ असला तथापि दुसऱ्या पुष्कळ गोष्टींनीं तो फारच निकृष्ट स्थितींत आहे असें म्हटल्यावाचून आमच्यानें राहवतनाहीं तो देश आपल्या ज्ञानाच्या योगानें संपत्तीचें माहेर घर झाला आहे. परंतु त्याची सर्व संपत्ती दुसऱ्या देशावर अवलंबून आहे. आमचा हा हिंदुस्थान देश ईश्वरकृपेनें मोठा सुपीक आहे यांत सर्व प्रकारचे जिन्नस थोडे बहुत उत्पन्न होतात; त्यामध्यें कापूसही उत्पन्न होतो; परंतु थोड्या दिसांपूर्वी तो या देशांतल्या गरजे पुरताच होत असे. अमेरिके कडील कापूस इंग्लंडास जाण्याचा बंद झाला तेव्हां तेथील व्यापारी इकडचा कापूस नेऊं लागले. याच संधीस मुंबईमध्यें अतिशय पैसा झाला. व्यापारी लोक द्रव्यमदानें इतके बेहोष झाले कीं आपण करतोंकाय वगैरे गोष्टींचा विचार अगदीं सुटला. अहो ह्या वेळेस व्यापारी लोक तर वेडे होतीलच, परंतु आमचें दूर दृष्टी इंग्रज सरकारही वेडें होऊन गेलें होतें; त्या वेडेपणामुळें सरकारी व्यांकेचा फडशा उडाला. आमच्या इकडील लोक शेतकीच्या किंवा दुसऱ्या कोणत्याही कामांत अडाणी होत या कारणानें पूर्वी जो इकडे थोडासा कापूस होत असे तो उत्तम प्रतीचा होत असे; परंतु इकडील जमीन उत्तम प्रतीची आहे. व मेहेनत व काळजी घेऊन कापुस लाविला असतां चांगल्या प्रतीचा निपजण्यास कांहीं हरकत नाहीं असें इंग्लंडांतील व्यापाऱ्यांस कळल्यावरून त्यांनीं या प्रकर्णी विलायत सरकारास अर्ज केला, त्याचा विचार होऊन या अमोल्य जिनसेची वृद्धि ज्या ज्या प्रकारांनीं होईल ते ते प्रकार योजण्याविषयीं विलायत सरकारची मान्यता मिळाली. यावरून आमच्या सरकारचें विशेष लक्ष लागलें, व कापसाची वृद्धी होण्या विषयीं व तो चांगला निपजण्या साठीं सरकारानें पुष्कळ प्रयत्न केले असें म्हणणें भाग आहे. आमच्या इकडील शेतकऱ्यांसही कापसापासून पैसा अतिशय मिळतो म्हणून कापूस लावावा अशी त्यांस इच्छा झाली आहे. अशी पुष्कळ पैसा मिळविण्याची इच्छा झाल्यानें जोंधळे गहूं वगैरे भाक्षात निर्वाहाचीं साधनें आपल्या जमिनींत लावावीं असें त्यांच्या मनांत देखील येत नाहीं. अशा गोष्टीनें आमच्या देशावर कांहीं काळानें मोठा दुर्घट प्रसंग येण्याचा सुमार दिसत आहे याचा विचार सरकार मनांतही आणित नाहीं यास काय म्हणावें? या विषयीं सरकार कांहीं विचार करित नाहीं इतकेंच नाहीं तर उलट कापसाची लागवड दिवसेंदिवस जास्त व्हावी अशा विषयीं सरकारचे सतत श्रम चालू आहेत. कापसाच्या लागवडीकडे शेतकऱ्यांचें विशेष लक्ष लागल्यानें पूर्वी जितका दाणा उत्पन्न होत असे त्यापेक्षां आतां पुष्कळ कमी होऊ लागला असें पुष्कळ लोकांचें म्हणणें आहे, व याप्रमाणें सर्व देशाच्या मानाने पाहूं गेल्यास धान्याचीं पुष्कळ कमतरता आली यांत संशय नाहीं. आज सात आठ वर्षें झालीं सारखी महर्गता आहे ती इतकी कीं चवदा शेराच्या वर धारणेचें मान चढत नाहीं. याचें तरी कारण काय? याचें मुख्य कारण दुसरें काय असावयाचें? ज्या जिनसाची बहुतेक लोकांस गरज त्या जिनसाचा पुरवठाच जर एकंदरीच्या मानानें पुष्कळ कमी झाला तर त्या जिनसाची किंमत अर्थात चढावयाचीच, यांत कांहीं भ्रांति आहे कीं काय? अद्यापि कापूस लावण्याची व

चांगला निपजविण्याची माहिती शेतकरी लोकांस थोडीच झाली आहे तोंच ही स्थिती, मग सरकारच्या सतत श्रमानें या कामांत शेतकरी लोक चांगले हुशार झाल्यावर मग काय गती होणार? जवळ पैसा असून उपाशी मरण्याचा प्रसंग येणार कीं नाहीं? अशी स्थिती कांहीं दिवसांनीं खासच येणार असें मानण्यास दुसरीं पुष्कळ कारणें आहेत. थोड्या दिवसांपूर्वी निजाम सरकारचे हुषार दिवाण सर सालरजंग बहादुर यांस असें समजलें कीं या सालीं बाकीच्या धान्याकडे जितकी जमीन गुंतली त्यापेक्षां कापसाच्या लागवडीकडे पुष्कळ जमीन गेली आहे. यावरून त्यांनीं कापूस लावलेल्या जमीनीच्या दर बिघ्यास पांच रुपये द्यावे असा हुकूम फर्माविल्याचें ऐकण्यांत आहे असें करण्याचें कारण इतकेंच कीं कापूस लावण्याकडे लोकांचीं मनें फारशीं वळूं नयेत परंतु हें त्यांनीं केलें यावरून शेतकऱ्यांचीं मनें कापसाची लागवड करण्या पासून फिरतील असें आम्हांस वाटत नाहीं. कारण कापसापासून जर शेकडोंपट फायदा होत आहे तर असल्या वाढलेल्या शुष्क दराला पाहून शेतकरी भितील असें कदापि होऊं सकणार नाहीं. यापासून इतकेंच मात्र होईल कीं सरकारास सालाबाद पेक्षां कांहीं जास्त पैसा मिळेल दुसरें कांहीं नाहीं दिवाण साहेबांनीं रयतेच्या कल्याणा साठीं म्हणून ही गोष्ट केली, पण आम्हांस खचीत वाटेल कीं या कारणानें त्यांचा स्तुत्य उद्देश कोणत्याही प्रकारें शेवटास जाणार नाहीं. या पेक्षां निराळ्या प्रकारें ही रयतेची इच्छा मोडली पाहिजे.

आमच्या इंग्रज सरकारानें कापसाची लागवड दिवसें दिवस वृद्धिंगत करण्याचें काम चालविलें आहे तें कांहीं कमी करावें म्हणजे प्रजेवर अनिवार संकट येणार नाहीं. कापसाच्या लागवडी बद्दल रयतेस उलट उपदेश करावयाचा नाहीं असा आमच्या सरकारचा बाणा असला तर निदान सरकारानें त्याकामाकडे आतां जसें अतिशय लक्ष लाविलें आहे तसें लावण्याचें तरी कमी करावें. आतां यावरून सरकारानें कापसाकडे मुळींच लक्ष देऊं नये असें आमचें मत नाहीं, परंतु अमेरिकेच्या बरोबरीनें जर आमच्या देशांतून कापूस जातो तर इतका बस आहे, यापेक्षां जास्ती कापूस या देशांतून जावा असें सरकारानें इच्छिणें हें आमच्या देशाच्या अनहितास कारण आहे असें आम्ही समजतों. आम्ही जी ही सूचना करितों हीबद्दल पुष्कळ लोक हसतील व ही भीती वेड्या सारखी आहे असें ही म्हणतील परंतु त्यांणीं थोडासा विचार केला तर त्यांचें त्यांसच समजेल कीं मुंबई मध्यें कापसाचा भरभराट झाला व व्यापारी लोकांस अतोनात पैसा मिळूं लागला तेव्हां पुढील दुष्ट व निरंतर निवास दुःख देणारा प्रसंग कोणा एकाच्या तरी स्वप्नी आला होता काय? त्यांस असें वाटलें कीं सदोदित असाच काळ राहील. त्या वेळेस कित्येक दूरदृष्टी लोकांनीं मात्र यापासून पुढें वाईट संकट येईल असें मानिलें, व आपला हात आखडला तर असे विचार व्यर्थ आहते असें विचारानें मानणें रास्त नव्हे असें आम्ही समजतों. शु० सू०

---

## रा० रा० विठोबा अण्णा दप्तरदार.

( लिहून आलेला मजकूर. )

तारिख २ अक्टोबर सन १८६९ च्या ज्ञानप्रकाशा वरून समजतें कीं रा० रा० विठोबा अण्णा दप्तरदार पुनर्विवाह अशास्त्र आहे असें सिद्ध करण्यास पुणें मुक्कामीं येणार होते परंतु आश्विन शुद्ध १५ पासून कार्तिक शुद्ध १५ पर्यंत त्यांचे घरीं अरुणोदय जागराचा उत्साह आहे सबब त्यांचें येणें करारापमाणें होत नाहीं. पुढें ही पौष अखेर पर्यंत त्यांस येण्यास फावणार नाहीं.

पत्रकर्ते महाराज, हे गृहस्थ खरोखरीच पुनर्विवाह अशास्त्र आहे,असें सिद्ध करून देण्यास, येणार होतेकाय. मलावाटतें, हा त्यांनीं पुनर्विवाह पक्षाचे लोकांस दहशत दिली असावी. वास्तवीक पुनर्विवाह खोटा आहे हें त्यांच्यानें सिद्ध करून देववेल ही आशा आतां व्यर्थ दिसते. पुण्यास वादविवाद करण्यासाठीं येण्याचा करार केला त्यावेळेस, ही, अडचण पुढें येणार हें त्यांस माहित नव्हतेंकाय? मनुष्य आहे, कदाचित् त्या वेळेस स्मरण झालें नसेल. व या कराराच्या वेळेस त्यांस वाटलें असेल कीं पुनर्विवाह अशास्त्र आहे अशा विषयीं कांहीं प्रमाणें आपल्या घरीं असतील व जे व्हां तीं प्रमाणें सांपडलीं नसतील तेव्हां जावें कसें? बोलावें काय? असा त्यांस विचार पडून त्यांनीं ही एक अरुणोदय जागराची सबब लिहिली असेल.

कारण,त्यांस जर पुनर्विवाह अशास्त्र आहे हें सिद्ध करून देण्याची शक्ती होती तर अरुणोदय जागराची सबब त्यांनीं दाखविली असती काय? धर्माचें काम एवढ्या महत्वाचें आहे कीं त्या साठीं नुसता वादविवाद करून आपल्या पक्षाचें प्रतिपादन करावें लागतें एवढेंच नहीं, कधीं कधीं मोठमोठीं संकटेंही या धर्मा साठीं सोसावीं लागतात- फार तर काय सांगूं पण या धर्माकरितां मोठमोठ्या भयंकर लढाया होऊन रक्त पात झाले आहेत? अशा ऐन आणिबाणीच्या प्रसंगांतही या लोकांनीं कोणती ही सबब न दाखवितां आपलें काम बजाविलें; व धर्माचे सर्व विधी व नेम धर्म जसे करावयाचे तसे केले. परंतु रा० रा० विठोबा अण्णा, या वेळेस अशी सबब लिहून पाठवितात हा मोठ्या दुःखाची गोष्ट आहे.

परंतु, तो काळ आतां नाहीं, धर्माकरितां युद्ध करून मरणारे व मारणारे लोक मेले. आतांच्या या काळांत सर्वत्र शांतता व स्वस्थता जिकडे तिकडे आहे. जिवाची गोष्ट तर बोलण्यासच नको, कोणाचे केसास ही धक्का नाहीं. अशा वेळेस पाहिजे त्यानें पाहिजे तसा वाद करावा. एवढी मोठी मोकळीक सर्वांस असतांनां पुनर्विवाहाच्या विरुद्ध पक्षाचे लोक शास्त्रें पुढें ठेवून आमच्या पक्षाचें खंडण कां करीत नाहींत? विठोबा अण्णास अरुणोदय जागराचा उत्साह करण्यास पुण्यासारखी वस्ती अयोग्य वाटली काय? मला टवातें जर ते पुण्यास आपल्या करारा प्रमाणें येऊन वाद चालूं करते व अरुणोदय जागराचा उत्साह रहूं न देतां तेथेंच करते तर त्यांस नुसत्या अरुणोदय-जागराच्या उत्साहाचें जें पुण्य मिळणार त्याच्या सहस्त्र पटीनें अधिक पुण्य मिळालें असतें.

कारण धर्माचें काम असेंच मोठ्या पुण्याचें आहे. कोणी मनुष्य अधर्मानें आचरण करतो त्यास धर्माच्या वाटेवर आणणें हें साधारण प्रतीचें काम नाहीं. जो असा धार्मिक मनुष्य त्या अधार्मिक मनुष्यास सुमार्गास लावतो त्यास निःसंशय अधिक पुण्य मिळेल.

रा० रा० विठोबा अण्णा यांज विषयीं लोकांच्या मनांत जी पूज्यबुद्धी होती ती निःसंशय त्यांच्या मनांतून कमी होईल. त्यांच्या न येण्यानें, पुनर्विवाह सशास्त्र आहे म्हणून जें ठरलें आहे तेंच कायम राहील. या पुनर्विवाहासारख्या गूढ व मोठ्या महत्वाच्या विषयावर वाद करण्याचा विठोबा अण्णांनीं करार केला असून वेळेस मागें सरून अरुणोदय जागराची सबब लिहून पाठवितात; यावरून पुनर्विवाह अशास्त्र असें ठरवीन असें जें त्यांचें म्हणणें त्यास बाध येतो.

विठोबा अण्णा सर्व पुनर्विवाहाचे पक्षाचे लोकांस पुनर्विवाह अशास्त्र आहे, असें सिद्ध करून देणार होते. ही गोष्ट पुष्कळ अंशीं ईश्वराची सेवा केल्या सारखी झाली असती, व अशा कृत्याच्या वेळेस जरी ते अरुणोदय जागरासारखी ईश्वराची दुसरी सेवा वगळते तरी ईश्वर त्यांस क्षमा करता.

पण तसें नाहीं- पुनर्विवाह सशास्त्र आहे. रा० रा० विष्णु परशराम शास्त्री यांनीं या विषयावर हजारो लोकांशी वाद केले त्या वेळेस तो अशास्त्र आहे असें सिद्ध करण्यास धैर्य धरून कोणीही मैदानांत आला नाहीं. आणि या वेळेस ते लोकमान्य व पूज्य पंडित टक्कर देण्यास तयार असता ही कोणी पुढें येत नाहीं हें मोठें आश्चर्य आहे! मागें व्यर्थ बडबड मात्र करतात.

पूर्वी विष्णू शास्त्री पंडितांचा सर्वत्र जय झाल्या कारणानें त्यांच्याशीं सामना करण्यास आतां लोक भितात. ईश्वर या पंडितांस सर्व ठिकाणीं जय देवो व त्यांनीं लिहिलेले सब ग्रंथ सशास्त्र आहेत असा विचार प्रतिपक्षी लोकांचे मनांत ठसो- ईश्वराचें सहाय या पक्षास आहे म्हणून प्रतिपक्षी लोकांस, समोर मैदानांत येण्यास धीर होत नाहीं.

रा० रा० विठोबा अण्णा पुण्यास येऊन पुनर्विवाहाचें खंडण करणार म्हणून उभय पक्षाचे लोक या मोठ्या प्रसंगाची वाट पहात होते. परंतु त्यांच्या न येण्यानें कोणाची ही निराशा न होतां पुनर्विवाहाचे पक्षास मिळण्यास पुष्कळ लोकांस धैर्य येत चाललें आहे व बरेच लोक मिळाले आहेत.

---

The Railway between Khamgaon and Jhellum on the Nagpore extension of the G. I. P. Railway will be the first State Railway opened in India. It was reported some months ago that, Lord Mayo accompanied by the Duke of Edinburgh intended to open this railway in February next. It is now doubtful whether the Royal Duke will visit India. The Australian papers give anything but a royal account of the sayings and doings which occurred on the Duke's visit to that colony. Bills left unpaid, and remuneration sought from the Parliament for mythical presents made, it is said, not to the most deserving of those honors in Australia. Giving allowance for exaggeration, still as there is no smoke in the wood without fire, we cannot but infer that a something not altogether creditable has taken place, or else the Colonial Government would not appear so riled at the conduct of the Duke. A young sailor, be he Duke or Plebeian, is not likely in his sky-lark ing, to please the sober, staid, colonial big wigs, who, in their wisdom fancied a boy Duke, ought to appear versed in all their finical proprieties.

However to return to our subject, the *Pioneer* has given us the estimate of the railway between Khamgaon and Jhellum. The formation and ballasting of the road is put down at Rs. 60,000— permanent way with sleepers delivered on the line, is reckoned at Rs. 175,000—the plate-laying at Rs. 10,000. The Khamgaon station and minor works, crossing, fencing, signals, &c., Rs. 40,000, in all Rupees two lacs and eighty five thousand, exclusive of the cost of establishment. Be it recollected though that this is only the estimate, the expenditure we shall know after the work has been completed.

This branch railway we owe to Lord Mayo, so it is said, rather we owe it to Khamgaon being a great Cotton Mart, and the Manchester Cotton Merchants, being aware that fairweather roads were the only means of transit, between Khamgaon and Oomerawuttee. The bales of cotton packed on bullocks suffered great loss in transit, for lumps of cotton were to be found on every bush on the road between the two markets, after the passing of one or two hundred bullocks loaded with cotton, Lord Mayo's energy and activity in urging on the construction of this branch railway, is owing in a gaeat measure to outside pressure of those whose interests are concerned. Yet we must not be the less thankful for the boon, no matter what the circumstances might have been, which has led to its bestowal.

It might be, that the cost of construction of this little branch line of seven or eight miles will be considered data in future for the estimates of all the Government Railways which are to be constructed in India. It is true that forty or forty-one thousand Rupees per mile, is very low contrasted with the Contractors' rates. If the Khamgaon line can be solidly constructed, and not superficially, and will stand fair tear and wear, similarly to the lines constructed by the Contractors, doubtless great praise will be due to the Department of Public Works. In this case, the financial economy anticipated by the Government, taking the construction of railways into their own hands is, not at all likely to turn out quixotical. But the branch line is not yet finished, and he is a very poor financier who counts his chickens before they are hatched. If single lines of railway, the construction of which is now in contemplation by the Government of India, can be carried out *cœteris paribus*, as cheaply as the estimated cost per mile, of the Khamgaon branch line, Lord Mayo and his advisers are wonderful Mechanicians, and no less wonderful Arithmeticians So Contractors must have been humbugging the several Railway Companies who have paid through the nose according to the Khamgaon estimated cost, for the construction of their respective lines in India. But we must not forget that this is the first attempt at Railway construction by the Government, and whether or no, the Engineers employed are experienced in the work they have undertaken, the sequel only will tell. However a new *impetus.* in railway construction, in *alto-relievo*, is brought to notice to the honor of the Public Works Department. The department which has been so much abused, more particularly since the arrival in India of Lord Mayo. Lord Lawrence was too well experienced to give heed to the spoutings and mad rantings of would-be politicians and financiers, against the Public Works Department. The construction of the Khamgaon branch

railway was not conceived in India, nor by an Indian legislator, but by commercial men in England having an eye to their own interests. It is likely to prove the wind that blows good to the much abused Public Works Department. The Department might now brush up, if the prospects owing to the cheap construction of the cotton branch line in Berar do not turn out a will-o'-the-whisp. We however expect a better upshot, and although new brooms sweep clean, yet the Public Works Department is a more seasoned broom than a new one, and doubt less has looked well before taking the leap into the *omnium gatherum* of cheap Railway plant.

We have a good deal of empiricism served up to us now-a-days. By whom? Experienced men of the world as they are called, who do not for a moment suspect themselves of quackery, when they in a most pragmatic way ever that such and such a thing is wrong, and such an idea is ridiculous. Now for the reason why these people are attended to. Because they possess a self confidence, blended with a command of manner which always carries with it a certain amount of influence, especially among easy-going-people, who dislike being troubled with *contradictum*. It has been ventilated by one of this class that, the cause of European vagrancy in India is, the free sale of liquor. That withdrawing the licenses from the vendors of spirituous liquors throughout India, would be a specific check to vagrancy, much more effective than shiping loafers to England. This appears to us a rather crude opinion. We unhesitatingly admit that closing all the liquor shops in India, under British rule, would keep the loafers sober, but the measure would be no *panacea* for vagrancy. On the contrary provide the loafers inclined to work with employment suitable to their several cases, and ship to England the idle, the lazy, and the drunkards amougst them. Until this can be done, European vagrancy cannot be radically cured. As to Mr. Maine's Vagrancy Act, it is all moonshine in respect of ridding India of loafers. For not one of them can be coerced by the Act to go on board any vessel sailing to England. Then what earthly use is an Act that cannot strike at the root of the evil, for the cure of which it has been ostensibly provided.

The empiric who so flippantly and indirectly charges the Government with the evil of vagrancy in permitting liquor shops to be open, has failed to prove it, in short he proves too much which proves nothing at all. Would any man in his senses advise the Government, to wantonly injure the property of a large portion of its subjects, merely to save a few ruffians from the crime of drunkenness. For to reclaim them from vagrancy the measure could not, nor would any other remedy but that of employment or coercive shipping to England.

The Government of India are to blame for having so long winked at the vagrancy which they had caused, by disbanding European Regiments. Added to this, no thought was given to the increase of the evil, by European workmen, having been brought out by Railway Contractors and discharged in the country. Another source of feeding the growth of the evil has been, Sailors having been allowed after discharge at the Presidencies, to rove about the Mofussil. When vagrancy reached to a certain extent, then the eyes of the Government were opened to the evil they had taken no timely stseps to repress. And the wise-acres in political economy, loudly blamed the grog-shops as the foundation and cause of an evil which liquor only served to expose in its vilest colours, but it cannot justly be blamed as the cause of the evil in India.

It may not be out of place here to say a few words regarding Malt and Ardent liquors, "Beer is food as well as drink. A little beef eaten with it makes up its deficiency in gluten, as compared with milk, so that beef, beer, and bread—our characteristic English diet are most philosophically put together, at once to strengthen, to sustain, and to stimulate the bodily powers." Now the Government is to stop the sale of this liquor at the cry of some stupid visionary, who thinks it a crime to use liquor, and because loafers as a rule, not as an exception, get drunk when they can.

Again Schiller says "spread out the thunder into its softest tones, and it becomes a lullaby for children," and the same principle operates in diluting alcohol instead of drinking it *neat*. A glass of whiskey diluted in a tumbler of water and sipped slowly, will have no appreciable effect upon a person who could not toss off a glass of neat whiskey without intoxication. Hence some people may appear more temperate, while in reality consuming a larger portion of ardent spirits, than other people. Some stupidly allege, that ardent spirits are incapable of serving any useful purpose in the Animal economy. Scientific men have left it on record, "1. That they directly warm the body 2. By the changes they undergo in the blood supply a portion of that carbonic acid and watery vapoure which, as a necessary of life are constantly being given off by the lungs. So far, they therefore supply the place of food—of the fat and starch which we usually eat, Liebeg says "Persons accustomed to the use of wine, when they take cod liver oil, lose their taste for wine." To sum up the properties of ardent spirits—1, they make a given quantity of food go further in sustaining the strength and bulk of the body. 2. They ease and lighten the labour of the digestive organs particularly grateful to a weak stomach Tee-totallers possessing more zeal than knowledge, will at once blame the Government for granting licenses to liquor sellers. They will tell us that every evil man is subject to, has sprung from the use of ardent spirits, consequently the destruction it has caused, justifies any means had recourse to, for stopping its sale. This reasoning in the abstract appears plausible. But let us examine a higher tone of ethics than that of the teetotallers. We are told not to do evil that good may come Would not the arbitrarily closing of liquor shops for the purpose of keeping loafers sober, be the ruin of those merchants, who on the good faith of our laws, expended their money in the purchase of liquors. What code of political economy teaches the principle that Governments are justified to beggar a portion of their subjects, in view to keep a few licentious men from indulging their morbid appetites.

*Central India Examiner*

## वऱ्हाड.

तिसरे तारखेच्या अरुणोदयांत लिहिलें होतें कीं "नामदार एलिस आपले मानि कौंसलर यांस वऱ्हाडचे चीफ कमिशनर नेमिलें व ते काम पाहूं लागले" आम्ही आपले बंधूस विच्यारितों कीं ही बातमी त्यांस कोणत्याआधारें मिळाली तें त्यांनीं कृपा करून कळवावें. कारण वऱ्हाडांत तर या वर्तमानाचें स्वप्नही नाहीं. आणि आमचे अरुणोदय कर्ते तर एलीस साहेब इकडील चीफ कमिशनरीचें काम पाहूलागल्याचें बेलाशक लिहितात तेव्हां ते कोठें ठण्यास बसूच काम पहातात काय? व त्यांनींच आमच्या बंधूस ही बातमी दिली काय? समजत नाहीं. आम्हीं आपले वाचकांस सांगतों कीं ही बातमी समूळ खोटी असावी. आतां अरुणोदयाचे लिहिण्यांत कल्पना तरी काय असावी याचा विच्यार केला तर असें दिसतें कीं आनरबल एलिस साहेबांची आनरबल टेंपल साहेबांचे एकझिक्युटिव कौंसलाचे जागेवर नेमणूक होऊन ते नुकतेच त्या कामावर रुजू झाले. यावर अरुणोदयाच्या सुज्ञ कर्त्यानें तर्क बांधला असावा. तो असा कीं टेंपल साहेबांची जागा एलिस साहेबांस मिळाली. टेंपल साहेब चीफ कमिशनर होतेच, आणि ती त्यांची चीफ कमिशनरी ही वऱ्हाडचे जवळच होती तेव्हां एलिस साहेबांस टेंपल साहेबांची जागा मिळाली म्हणजे ते वऱ्हाडचे चीफ कमिशनर झाले असें तर्कशास्त्र आमचे बंधूनीं चढविलें असावें असें दिसतें.

काटन कमिशनर मि० कार्नाक साहेब यांनीं सरकारास शिफारस केली आहे कीं: वऱ्हाडांत दोन व नागपुरांत एक असे तीन विलायतेहून उत्तम माहितगार शेतकरी लोक आणावे व त्यांजकडून कापसाचे लागवडीची माहिती इकडील लोकांस करून द्यावी. त्यांनीं या बाबद विलायत सरकारास लिहिलें आहे.

### अकोला.

पुढील महिन्यापासून सोमवारचा बाजार रविवारीं भरेल व बुधवारीं गावचे पश्चिम भागीं दुसरा बाजार भरत जाईल.

चवदावे तारखेस भुसावळेस रेलवेचे चीफ कमिशनर मि० ब्रेटन साहेब यांनीं युरोपियन लोकांस मोठा बाल (मेजवानी) दिला. त्याकरितां कमिशनर, डिपुटी कमिशनर वगैरे बरीच मंडळी येथून गेली होती त्या विषयींची हकीकत कळल्यावर पुढें लिहू.

अडगावचे एकाट्रा असिस्टंट कमिशनर चें कोर्ट पुढील महिन्यापासून येथें येणार आहे.

येथील हायस्कुलांतील मि० गोर साहेब मरण पावले त्यांची १७५ रुपये पगाराची जागा आजवर रिकामी होती तिजवर नागपुरचे क्युरेटर रा० रा० काशीनाथराव मराठे बी०ए० यांची नेमणूक डायरेक्टर साहेबांनीं केली. हे ग्रहस्थ हुशार असून एम ए च्या परीक्षेस जाण्याचे तयारींत आहेत व लवकरच येथें येतील.

रा० रा० वजाबा रामचंद्र प्रधान वाशिमचे डिपुटी इन्० इन्स्पेक्टर येथें आले. परवाचे दिवशीं शाळाखात्याची मंडळी परिक्षेकरितां उमरावतीस जाणार.

मि० स्कार्जी साहेब हायस्कुलाचे हेड मास्तर यांस मुंबईस युनिवर्सिटीचे परीक्षेत मेंबर नेमिलें आहे.

नोवेंबर महिन्यांत कांहीं शाळा नवीन होणार अशी बातमी पसरली असून कित्येक उमेद्वारही येथें आले आहेत. परंतु शोधाअंतीं आम्हांस समजलें कीं ही बातमी खोटी आहे. नव्या शाळा पांचचार महिने होत नाहींत.

सन १८६७चे १५वे आक्टाप्रमाणें अकोल्याचे म्युनिसिपल कमेटीचे मेंबरांची नांवनिशी रेसिडेन्सी आर्डरमध्यें छापून आली आहे. मुळचे कांहीं मेंबर कमी केले आहेत व कांहीं नवीन नेमिले आहेत. आतां एकंदर मेंबर आहेत ते.

डिपुटी कमिशनर प्रेसिडेन्ट, असिस्टंट कमिशनर व्हाईस प्रेसिडेन्ट, व मेंबर डाक्टर पोर्टर साहेब, मि० लेडलो साहेब, मि० जोरावरखान, मि० खंडेराव बाळाजी, मि० बमंजी उकडजी, मि० गंगाधर जोरावरमल, मि० गोविंदराय गुलाबराय, मि० आबास बेग, मि० विष्णु सदाशिव, मि० वामन प्रभाकर, व तहशीलदार अकोला.

## वर्तमानसार.

सालमजकुरीं मुंबईस परिक्षेकरितां उमेद्वार जमणार ते—म्याट्रिकुलेशनकरितां ८५०, बी ए करितां ५२, लिटलगोकरितां १०५, एम एकरितां १७, व इंजिनियरच्या पहिल्या परिक्षेकरितां ७, उमेद्वार आहेत.

पंजाब प्रांतांत आतां दुष्काळ पडण्याचें भय राहिलें नाहीं.

त्रावणकोरचे राजास हिंदुस्थान सरकारानें कायदेकौन्सलाचे मेंबर होण्याविषयीं विचारिलें होतें पण त्यांनीं ती जागा पतकरिली नाहीं असें कळतें.

संपोसर्गजन्य रोगाचा आकट बेळगांव शहरास लागू झाल्याचें कळतें.

मुंबई इलाख्यांतील विद्याखात्याचे डायरेक्टर मि० पील साहेब अहमदनगरास गेले आहेत. व तेथील शाळांच्या परीक्षा घेऊन खुशी झाले असें कळतें.

आम्हांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं ठाण्याचे आमचे बंधु अरुणोदय कर्ते यांस आलिकडे साडेतीनशे रुपये माजिस्ट्रेटकडून दंड झाला होता तो अपिलांत सेशन जजानीं रद्द केला व परत देवविला.

नाशकास रा०रा० परशराम विष्णु योगी वकील यांस प्रासिक्युटर नेमिलें.

आम्हांस असें कळतें कीं, कोल्हापुरकर श्री० महाराज छत्रपती यांच्या राज्याचा कारभार सरकारच्या हुकुमावरून कोल्हापुरचे पोलिटिकल एजंट हे पहात आहेत. परंतु महाराज वयांत येऊन स्वतः काम करण्यासारखे हुषार झाल्यामुळें तूर्त त्यांच्या खाजगीचा कारभार त्यांच्याकडे देणार आहेत. ज्ञा०प्र०

नोटिस-- राजश्री केसोराम रामनस साहु दुकान पेठ खामगांव यास रामसूक गौड ब्राम्हण राहणार खामगांव यांजकडून देण्यात येते कीं तुम्हीं तारीख २५ सपटंबर सन १८६९ चे वऱ्हाड समाचार पत्रांत तारीख २१ सपटंबर सन मजकूरची नोटिस दिली ती तारीख७ आकटंबर सन मजकुरी पावली तिचें उत्तर.

१ आम्हीं मुरली सिंग हालवाई याचे दुकानचे वहिवाटदार नाहीं.

१ तुम्ही दुकानचे भाड्याबद्दल मुरली सिंग हलवाई याजबराबर दुकानचे भाड्या विषयीं वगैरे जोकरार केला असेल त्याची माहिती अम्हास नसोन करार करणारे व तुम्ही आपसात पाहून घेणें आम्हाकडे भाड्याबद्दल किंवा दुकानाबद्दल संबंध नाहीं.

१ दुकान खाली करून देण्याचा आम्हीं तुम्हाबरोबर कधीं करार केला नाहीं.

१ मुरलीसिंग हलवाई याचा स्वयपाक करण्यापुर्ते आम्ही त्याचे नवकर असल्यामुळे आम्ही तुमचे किंवा मुरलीलाल चे जबाबदार नाहीं.

१ जेव्हा मुरलीलाल हा देशी गेला तेव्हा तो तुम्हास भेटून व विच्यारून गेला आहे त्या वेळेसच तुम्ही दुकान खालीं करून घेण्याचे होतें तसें तुम्ही केले नाही ही तुमची चूक आहे यास्तव आम्ही अगदी जबाबदार नसून तो देशी गेल्याचे मागें आम्हास गैरशिस्त रितीनें कळविणें तुम्हास योग्य नाही.

याप्रमाणें तुम्हास कळविलें आहे. तुमची मर्जी असल्यास मुरली सिंग याजकडे देशांत लिहून कळवून बंदोबस्त करून घेणे. आम्हांवर कोणत्याही प्रकारची जबाबदारी नाहीं हें तुम्हांस कळावें तारीख १२ अक्टोबर सन १८६९ इसवी.

(सही) रामसुख बसंत गोड ब्राम्हण

## नवीन व्रतरत्नाकर.

हा ग्रंथ वेदशास्त्रसंपन्न राजश्री शामराव दादा पौराणीक इनामी जहागिरदार मौजे निंबगांव तालुके माळशीरस यांणीं नवीन केला आहे. यांत संपूर्ण व्रतें एक वर्षांत जितकीं येतात तितकीं सर्व असून व्रताचे आरंभीं त्याचा शास्त्रार्थ लिहिला असून दर एक व्रताची पूजा, कथा, उद्यापन, याज्ञिक, प्रयोगसुद्धां तयार केला आहे. तो मालकीचा हक्क आम्हांस दिला असून तो हल्लीं आमचे छापखान्यांत शिळाप्रेसावर छापण्यास आरंभ केला आहे. हा ग्रंथ अनुष्टुप छंदानें सुमारें १७००० होईल. त्यांत पूर्वीचे आधारानें सर्व व्रतें घातलीं असून रचना मात्र नवीन विद्वन्मान्य व आबाल वृद्धांस समजावे अशी सुलभ केलेली आहे. व्रतें सर्व तिथीक्रमानें, तसेंच संक्रांती व नक्षत्र अशा क्रमानें मालिका घातली आहे. खेरीज स्फुट व्रतें प्रसन्न राघव व सत्यनारायण अशीं बहुतकरून सर्व यांत आहेत. याजबद्दल व्रतार्क, व्रतराज ,, व्रतकौमुदी असे पूर्वीचे ग्रंथ आहेत परंतु ते दुर्बोध आणि संक्षिप्त प्रकार आहेत. आणि हा ग्रंथ साग्र असोन यांत कोणतेही रीतीची अडचण येईल असा नाहीं असे प्रकारचा असोन सर्व भिक्षुक व विद्वान यांस उपयुक्त असा आहे. ग्रंथ कर्त्यांनीं अनेक ग्रंथाधार पाहून फार मेहेनतीनें रचना केली आहे. यांत व्रतास ग्राह्य, अग्राह्य पदार्थ वकाल इत्यादि प्रतिनिधी असा सर्व खुलासा केला आहे. याचा चतुष्पत्री साचा असून मोठें सुवाच्य अक्षरानीं लिहून कागद फार उत्तम जाड घातले आहेत आणि याची किंम्मत सर्वांस सुलभ रितीनें पडावी अशी ठेविली आहे. आगाऊ पैसा देणारांस रु० ६ सही करणारांस रुपये ७ व मागाहून रुपये ८ पडतील. डांक हांशील शिवाय पडेल. आगाऊ पैसा भरणें अगर पत्रें पाठविणें असेल त्यांनीं सोलापूर येथें ,' कल्पतरु '' छापखान्याचे मालक यांजकडे, अगर सातारा येथें महाराष्ट्रमित्र कर्ते यांजकडे, अगर पुणें येथें ज्ञानचक्षुचे मालक यांजकडे, अगर अकोला येथें वऱ्हाड समाचार पत्राचे मालक यांजकडे पाठवावीं. हा ग्रंथ माहे फेब्रुआरी सन १८७० इसवीं अखेर तयार होऊन मार्च महिन्यांत वर्गणी दारांस मिळेल. किमतीबद्दल टिकिटें पाठविणें झाल्यास वर्तावल्यासह यावीं. पत्रें पोष्टपेड यावीं. या ग्रंथास विद्वान व सुज्ञ आश्रय देतील अशी आशा आहे.

ता० ४ जुलई १८६९ इसवी.

कल्पतरूचे मालक

नोटिस—गणपती वलद पाहाडसिंग सानाने राहाणार मौजे लोणवाडी प्रगणे नांदुरे तालुके मलकापुर यांस खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे कडेस आमचे कोर्द खाते वही वरून येकंदर आजपावेतो आमचे रुपये १८५० अठराशे पन्नास रुपये निघाले असून तुम्हीं गेल्या दिपवाळीला हिशोब रुजू करून दिला आहे आणि त्याबद्दल आम्हीं पुष्कळवेळा रुपयाची मागणी केली आहे पण तुम्हीं ऐवजाचा उलगडा केला नाहीं सबब ह्या नोटिशीनें तुम्हास कळविलें आहे तर ही नोटिस पावल्यापासून १५ पंधरा दिवसाचे आंत आमचे ऐवजाचा फडशा करावा हें न केल्यास या नोटिशीचे खर्चासह तुमचेवर सदर रकमेची कोडतांत फिर्याद करूं. कळावें तारीख १२ माहे अक्टोबर सन १८६९ इसवी. मुक्काम अकोले

(सही) तुलाखीदास किसनचंदजी सराफ दुकान नांदुरे तालुके मलकापुर दस्तुर वहिवाटदार येकोबा वलद रामजी गुमस्ता

नोटिस—तानाजी वलद जानजी गोत्रकार राहाणार मौजे माटरगांव तालुके बाळापुर यांस खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे कडेस आमचे कोर्द खाते वही वरून एकंदर आज पावेतों आमचे रुपये १५६० पधराशें साठ रुपये येणें निघाले असोन तुम्ही गेले दिपवाळीला हिशोबही रुजु करून दिला आहे आणि त्या बद्दल आम्ही पुष्कळ वेळ रुपयांची मागणी केली आहे पण तुम्ही ऐवजाचा उलगडा केला नाहीं सबब ह्या नोटिशीनें तुम्हांस कळविलें आहे तर नोटिस पावल्या पासून १५ पंधरा दिवसाचे आंत आमचे ऐवजाचा फडशा करावा हें न केल्यास ह्या नोटिशीचे खर्चासह तुमचे वर सदर रकमेची कोडतांत फिर्याद करूं. कळावें तारिख १२ माहे अक्टोबर सन १८६९ इसवी मुक्काम अकोले

(सही) तुलाखी दास किसन चंदजी सराफ दुकान नांदुरा तालुके मलकापुर दस्तुर वहिवाटदार येकोबा वलद रामजी गुमास्ता.

नोटिस—माधव वलद एकोबा पाटील राहाणार शेलवड तालुके भुसावळ यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं माझे नावची जमीन सरवे नंबर ३३६ एकर ८ गुंठे १० आकार रुपये १८ चींत कपाशीचा पेरा माझे राजी रजावंदी वांचून केला व माझी आडते तेथून काढून दिलींस त्यास हें तूं गैर केलेस अस्तु तुला आतां मी इतकेच या नोटिशीनें कळवितें कीं तूं त्या शेतांतील कपासी माझे परवानगी वांचून वेचूंनये याबद्दल मी दिवाणांत तुजवर काम चालविलें आहे तूं माझा पुतण्या खरा परंतु विभक्त असून त्या शेतांतील सदरचा माल तूं अफरातफर करूं नये हें मी तुला वाजिब्बस सांगतें याप्रमाणें न वर्तल्यास कायदेशीर तुजवर इलाज करून नोटिसीच्या खर्चासह खर्च भरून घेतला जाईल.

(सही) अमृता बाई मर्द गुलाबा पाटील वस्ती शेलवड निशाणी खुद हातची बांगडी.

नोटिस केशव पुरुषोत्तम पानट मौजे पिंपळगांव काळे तालुके जळगांव जिल्हा अकोलें यांस नोटिशीचा जबाब देणार बनीचंद उदाराम मारवाडी मौजे पिंपळगांव काळे तर्फ व तालुके मजकूर याजकडून देण्यांत येते तिचें उत्तर येणें प्रमाणें.

तुम्हीं तारीख ८ माहे सप्तंबर सन १८६९ इसवी रोजीं आमचे नांवें नोटिस दिली ती तारीख २१ माहे मजकूर रोजीं आम्हांस पावली तुम्ही नोटिशींत असें लिहितां कीं ज्या वाड्यांत आम्ही राहतों ती जागा तुमची नसून ती जागा सर्व आमचे हातची बांधलेली आहे. तर याजबद्दल आम्हीं तुम्हांस कोणता दस्तऐवज करून दिला आहे तो दस्तऐवज काढावा जर आमचे सहीचा दस्तऐवज तुमचेजवळ असेल तो आम्ही दृष्टीनें पाहून त्या दस्तऐवजांत जागा तुमची असून तुमचे हातची इमारत बांधली आहे व आम्ही तुम्हापासून भाड्यानें कबूल करून राहिलों असें जर आमचे सहीचे दस्तऐवजांत निघेल तर मग मात्र जागा आम्हांस मागाल तर तुम्हांस अधिकार आहे या शिवाय सदरील वाड्यावर तुमची मालकी आहे असें आम्ही समजत नाहीं.

आम्ही ज्या वाड्यांत राहतो ती जागा पूर्वी राफड असून त्याजवर इमारत बांधते समई सरकारास जागा मागुन घेऊन वाडा बांधला त्यास सुमारें ३५ पसतीस वर्षें होऊन गेलीं. आम्ही राहात आहों व राहिल्या दिवसापासून कधींच जागा खालींकरून द्यावी असें तुम्ही म्हटलें नाहीं आतां बिनाकारण येकदम भले मनुष्यांवर नोटिस देणें हे बरोबर नाहीं.

त्याप्रमाणे गावकरी लोक जागेवर राहून वहिवाट करितात त्याप्रमाणें आम्ही ही राहातों तुम्ही आपली जागा म्हणता व इमारत ही बांधण्याचे नोटिसींत कळवित। त्यास ही तुमची शुद्ध लबाडी आहे तुम्ही बिनाकारण आम्हांस नोटिस दिली याजकरितां नोटिसीच्या जबाबाचा खर्च व छापखान्यांत येण्या जाण्याचा सर्व खर्च भरून दावा न दिल्यास शिरस्त्याप्रमाणें फिर्याद करून भरून घेण्यांत येईल खर्चाबद्दल जबाब नोटिस दिल्यापासून ५ पांच दिवसाचे आंत दावा न दिल्यास शिरस्तेप्रमाणे फिर्याद करण्यांत येईल कळावें तारीख ८ अक्टोबर सन १८६९ इसवी. मुक्काम अकोला.

(सही) बनी चंद उदाराम मारवाडी दुकान पिंपळगांव काळे परगणें जळगाव वहिवाटदार जमनादास सदाराम मारवाडी दस्तूर खुद.

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें त्यास दोन वर्षें पुरीं झालीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास वेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस हो विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं आजबदलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धआणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present and past years, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

## नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत मागेंच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ०६ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल. व. स. म्यानेजर

किमतीचे ठराव.

| | रु. | अ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास ... ... | ६ | ० |
| साल अखेर ... ... ... | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ... ... | ३ | ८ |
| एक अंकास ... ... | | ५ |
| फुटकळ ... ... ... | ० | ५ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षांचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व साल अखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत... ... ... १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छापून प्र० केलें

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL. IV — AKOLA :—SATURDAY EVENING, OCTOBER 23, 1869 — NO. 42

पुस्तक ४ — अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २३ माहे आक्टोबर सन १८६९ इ० — अंक४२


## नागपुर अब्झर्वर.

आम्हांस असें कळलें आहे कीं नागपुरास अब्झर्वर नावाचें इंग्लिश मराठी वर्तमान पत्र निघत होतें तें अगदीं बंद झालें असें नाहीं व तसें वर्तमान तेथील नवीन वर्तमानपत्र सेंट्रल इंडिया एक्झामिनर यांत जे लिहिलें आहे तें खोटसाळ बुध्धीनें लिहिलें आहे. व अब्झर्वर पत्रास हरकत आणण्यास कित्येक अंशीं तेंच कारणभूत आहे. तथापि मालकाची इच्छा तशी नाहीं. इंग्लिश व मराठी भागाकारितां चांगले दोन एडिटर मिळाले म्हणजे तें पत्र लवकरच पुन्हां चालू होणार आहे. त्या पत्राचे व कारखान्याचे मालक रा० रा० लक्ष्पणराव अकूलवार यांनीं आजपर्यंत दहापंधरा हजार रुपये त्या कारखान्यांत मोठ्या उदार बुद्धीनें घातले आहेत व ईश्वराची त्यांवर उत्तम कृपादृष्टी आहे म्हणून इतर छापखानेवाल्यांप्रमाणें कारखान्यांतील उत्पन्न प्रपंच्यास लावण्याची आवश्यकता त्यांस नाहींच. फक्त कारखाना सुरळीत चालावा व तेणेंकरून त्यांचा लौकिक व्हावा इतकीच इच्छा ते बाळगून आहेत.व पुन्हा कारखाना सुयंत्र चालण्याची उमेद दिसली तर ते आणखीही भांडवल त्यांत घालूं शकतील असें आम्हांस दिसून आलें आहे व नागपुर अब्झरवर तहकूब राहण्यास त्यांचें पुष्कळ दिवस बाहेर गावीं जाणें हें कारण झालें होतें व गेल्या आठवड्यांत ते परत आले ओहत आतां त्यांस आमचीशिफारस आहे कीं त्यांनीं आपण लावलेलें झाड सुकूं देऊ नये व देशावर आपले नावाची पसरलेली कीर्ती आखडून घेऊनये. कांहीं योग्य बंदोबस्त करून नव्या पर्यायानें तरी हें पत्र लक्ष्मण रावजींनीं पुन्हा चालू करण्यांत त्यांस मोठें भूषण आहे. व या समयीं देशहितेच्छु लोकांनींही विशेष खटपटीचें साहित्य त्यांस केलें पाहिजे व हा कारखाना पुन्हा उभारला पाहिजे असें आमचें मत आहे. पुणें, ठाणें, सातारा, अहमदनगर इत्यादि मराठी दरएक जिल्ह्यांत दोन दोन वर्तमान पत्रें नेटिवांचीं आहेत. लगत्यास वऱ्हाड प्रांत असून यांतही तीन वर्तमान पत्रें आहेत. आणि नागपुरा खालीं १९ जिल्हे त्यांत मराठी जिल्हेही च्यार पाच असतां तितक्यां करितां एवढ्या मोठ्या नागपुर राजधानींत नेटिवांचें वर्तमानपत्र एकही नाहीं ही तेथील विद्वान, सुधारक, देशहितेच्छु व परोपकारी लोकांस मोठी लाजेची गोष्ट आहे यांत संशय नाहीं. व या करितां तूर्त युक्ती एवढीच आहे कीं लक्ष्मण रावांच्या उदार खर्चानें जो मोठा कारखाना तेथें येऊन पडून राहिला आहे त्यांत नेटिव वर्तमानपत्र चालू करण्याची त्यांनीं व सदर मंडळींनीं त्वरा करावी व ईश्वर त्यांस तसें करण्यास सहाय करो.

## जमाखर्चांतील तोट्या विषयीं.

आमच्या वाचकांस माहित आहेच, कीं खर्चाचे साधारण व असाधारण असे दोन भेद करून असाधारणांत येणारीं कित्येक कामें साधारण खर्चांत आणून सर रिचर्ड टेंपल साहिब यांणीं चालू सालचा अजमास केला त्यांत एकंदर जमेपेक्षां खर्च अधिक लागणार असें दाखविलें, व जमा खर्चाची तोंडें सारखीं मिळावीं म्हणून शेंकडा एक टक्का प्राप्तीवर कर बसविला, व एकंदर चोवीस लक्षांपेक्षां कांहीं अधिक इतकी शिल्लक राहील असें जाहीर केलें. आतां टेंपल साहेब यांची हुशारी व हिशेबी कामांत वाकबगारी याविषयीं कोणास शंका नाहींच. असें असतां आतां जहालेल्या अजमासांत चूक झाली असें समजून राहाणाऱ्या शिलकेचें स्वरूप बदलून सव्वादोन कोटी तोटाच येणार असें समजतें. ही चूक चालू वर्षांतच झाली असें नाहीं. गेल्या तीन वर्षांत इकडे जमाबंदीच्या खात्यावर हुशारच प्रधान होते. आणि त्यांच्याही कारकीर्दींत ही चूक अशीच चालत आलेली आहे. म्हणजे सन १८६६।७ सालीं अडीच कोटींहून ज्याजती तोटा, सन १८६७।८ सालीं एक कोटीहून ज्याजती तोटा, गेल्या वर्षींही सवा दोन कोटीहून अधिक तोटा, आाणि चालू सालांतही एक कोटी बाहात्तर लाखांचा तोटा आहे. गेल्या वर्षीं जमेचा जो अजमास झाला होता, त्यापेक्षां पन्नास लक्षांच्या जवळ जवळ आधिक जमा आली असें झालें नसतें तर गेल्या वर्षाच्या तोट्याची रकम मोठीच वाढली असती. जमाखर्चाचा अजमास प्रथमच होत असता तोटा येण्याचें कारण काय? असा सहजच प्रश्न उत्पन्न होतो. आपले गव्हर्नर जनरल यांणीं याबद्दल स्टेट सेक्रेटारीस गेल्या महिन्याच्या २६ व्या तारखेस रिपोर्ट केला आहे, त्यांत असा तोटा येण्याचीं कारणें बरींच लिहिलीं आहेत; पण त्यांत मुख्य कारणें दिसतात तीं अशीं, पब्लिकवर्क डिपार्टमेन्टाकडे गेल्या वर्षीं जो खर्च लावून दिल्हा होता त्यापेक्षां ८४ लाख रुपये अधिक खर्च झाला, आाणि या खर्चांत ३३ लाख खर्च करण्यास तर मुळींच सरकार मान्यताही मिळाली नाहीं. "होमच्यार्जेस्"म्हणजे हिंदुस्थानानिमित्त विलायतेंत होणाऱ्या खर्चास जी रकम नेमून दिल्ही होती, त्यापेक्षां तिकडेही ८९ लाख रुपेय अधिक खर्च झाला. रेल्वे कंपनीच्या भागीदारांस पांच रुपये शेकडा व्याज मिळेलच याबद्दल आपलें सरकार जामीन राहिलें आहे. त्या कंपन्यांचें उत्पन्न व्हावें तितकें न झाल्यामुळें आपल्या सरकारास ४९ लाख रुपये खर्च बसला. याप्रमाणें गुदस्त सालची तोट्याची रकम वाढली यावरून असा प्रश्न निघतो कीं सरकारानें मोठमोठाले पगार देऊन नेमलेले तपासनीस काय काम करीत असतात? ते तपासणी कारितात ती कसची? त्यांस हा ज्याजती होणारा खर्च समजत होता कीं नाहीं? ते फक्त आमच्या म्युनिसिपालिटीच्या तपासनिसांसारखे नुसती खर्चाचीं बिलें पाहून त्या बिलांप्रमाणें रकमा खर्चीं पडल्या आहेत कीं नाहींत इतकेंच पाहात होते? किंवा त्यांणीं कधीं ही गोष्ट सरकारच्या नजरेस आणली होती? या प्रश्नांचीं उत्तरें त्या तपासनिसांवाचून दुसऱ्याच्यानें देववणार नाहींत. या वाचून तोटा येण्यास दुसरींही कारणें आहेत. प्रथम जमाखर्चाचा अजमास करण्याची रीती मि. जे. उइलसन यांणीं आठ नऊ वर्षांपूर्वी सुरू केली. याचा हेतू इतकाच दिसतो कीं चालू खर्च आपल्या जमेच्या आंत असावा. हा हेतू पूर्णपणें अमलांत आणला असता तर अशा रीतीनें तोटा कधींही झाला नसता. सन १८६१ सालांत जी सरकारास जमा येत होती, त्या जमेपेक्षां आतां पांच कोटीहून जमा आधिक येत आहे. पण जमा वाढली त्याच मानानें खर्च वाढावा, तसें न होतां वरील मुदतींत खर्चाची रकम सात कोटींहून आधिक वाढली. यांत पब्लिक वर्क खात्यांत अधिकाधिक खर्च वाढत आहे. गेल्या वर्षींच किती रकम त्या खात्यांत आधिक खर्च झाली हें वर सांगितलेंच आहे. यंदाही त्या खात्याकडे साडे पांच कोटी रुपयांहून अधीक रकम अजमासांत लावून दिली आहे. म्हणजे पूर्वीच्या सहा वर्षांत त्या खात्याकडे जो दरसाल खर्च होत होता त्यापेक्षां यंदा दोन कोटींहून अधिक. आतां ज्या रयतेकडून सरकारास एवढी मोठी रकम जमा होते, त्या रयतेच्या कल्याणार्थ रस्ते कालवे वगैरे कामें व्हावीं हें रास्त आहे. पण कर्ज काढून सण करणें रास्त नाहीं. याचप्रमाणें दुसऱ्याही खात्यांत जमेच्या प्रमाणाकडे लक्ष न देतां खर्च वाढला आहे. सरकारातही अजूनपर्यंत खर्च मान्य करण्याची एक चमत्कारिक रीती आहे. जी रीती लार्ड मेयोच्या आगमनानें समूळ नाहींशी होईल. हल्लीं जे त्यांणीं खात्याखात्यांतून हुकूम फर्माविले आहेत त्यांवरून आशा दिसत आहे. ती रीती अशी कीं, ज्या कामास रकम अजमासांत लावून दिली आहे त्यापेक्षां अधिक खर्च करावयाचा असेल तेव्हां त्या खात्याकडील अधिकारी बेलाशक खर्च करितात; व सरकाराकडे तो खर्च होण्याची परवानगी मागितली आहे अशा सबबेवर तो खर्च सरकारी आडिटर (तपासनीस) यांजकडून मंजूर होत असतो. त्याचप्रमाणें कित्येक कामगार ज्या कामासाठीं अजमास होते वेळीं कांहींच कळवीत नाहींत. त्या कामानिमित्त पाठीमागून खर्च करीत असतात. त्याचप्रमाणें एकाद्या कामासाठीं जाहालेल्या खर्चाच्या अजमासापैकीं सर्व रक्कम खर्च न झाली तर ती दुसऱ्या वर्षाच्या अजमाभांत मजुरा व्हावी, पण तसें होत नसे. हल्ली गव्हर्नर जनरल यांणीं या रीती बंद होण्यासाठीं सक्त हुकूम फर्माविले आहेत. हल्लीं ही जी चूक उमगली याचें कारण असें कळतें कीं, या मागें वर्षाच्या अखेरीस खरोखर जमाखर्च काय झाला त्याबद्दल ताळेबंद सरकारा समोर येत असे. लार्ड मेयो यांणीं ही रीती बंद करून तीन तीन महिन्यांनीं ताळेबंद मागितले त्यावरून हा पुढें येणारा तोटा नजरेस आला.

हा तोटा भरून काढण्यासाठीं दोन उपाय.—खर्च कमी करावा किंवा रयतेवर नवीन कर बसवावा. नेहमी जाजती नाजती कर देणें हें रयतेस आवडत नाहीं. साम्राज्य असतां तर सहन होतच नाही, आणि व्यापारास व उत्पन्नास तेजी नसतां तर अशा करापासून त्रासच होतो. पण सरकारास अशी अडचण प्राप्त झाल्यास सरकारानें ती अडचण लोकांस सांगणें व त्यांकडूनच मदतीची इच्छा करणें यावांचून दुसरा इलाजच नाहीं. यासाठीं लार्ड मेयो यांणीं वरील दोनीही युक्ती अमलांत आणण्याचें मनांत आणिलें आहे. चालू सालांत पब्लिकवर्क खात्याकडे जी रकम अजमासांत लावून दिल्ही आहे, तींत ऐशी लाख रुपये कमी करण्यासाठीं हुकूम दिल्हा आहे यांत मुंबई खात्याच्या वांटणीस साडेबारा लाख त्या खात्यांत कमी व्हावयाचे. याचप्रमाणें दुसऱ्याहि इलाख्यांत त्यात्या इलाख्यांच्या मानानें त्या खात्यांत खर्च कमी व्हावयाचा. मुंबई व मद्रास इलाख्यांत मिठावर जकात जी आजपर्यंत घेत असत त्यापेक्षां पाच आणे दर मणीं आधिक वाढविली. व प्राप्तीवर कर सहा महिने पर्यंत शेकडा दोन टक्के केला. हा अधिक प्राप्तीवरील कर तारीख १ ली दिसेंबर पासून अमलांत येऊन ता० ३० मार्च १८७० रोजीं बंद व्हावयाचा. तात्पर्य च्यार महिन्यांत सहा महिन्यांचा नफा काढण्यासाठीं हा कर शेंकडा अडीच टक्के घेतला जाणार. मिठाचा खप प्रत्येक कुटुंबांत विशेष होतो असें नाहीं तेव्हां त्यावर पाच आणे अधिक जकात बसल्याच्या योगानें लोकांस भारी पडेल असें नाहीं. असें असून त्यापासून सरकारास पन्नास लक्षांचें उत्पन्न येईल. त्याचप्रमाणें एक टक्का सहा महिने पर्यंत प्राप्तीवर अधिक घेतल्यानें ही सरकारास चौतीस लक्ष रुपये जाजती येतील असा अजमास केलेला आहे. लष्करी खात्याकडे कांहींच कमी केलें नाहीं फक्त विलायतेंत या खात्याकडे सव्वातीन कोटी रुपये खर्च होत आहे. हा खर्च कमी होणें रास्त होतें. त्याचप्रमाणें "होम च्यार्जेस्", चा खर्चही सात वर्षांत एक कोटी रुपयांनीं आधिक वाढला इकडे लक्ष देणें वाजवी होतें. पण देतो कोण? मि० द०

## वऱ्हाडांतील तरुण विद्वान मंडळीचें पाऊल पुनर्विवाह पक्षास मागें- किंवा पुढें?

आमच्या वऱ्हाडास हा मोठा प्रश्न आहे व त्याचें विधिपक्षी उत्तर कृतीच्या द्वारें त्यांकडून मिळालें पाहिजे अशी सर्व देशहितेच्छु लोकांची आशा आहे.

वऱ्हाडांतील तरुण विद्वान या शब्दांनीं तूर्त काळास बाहेर प्रांतांतून उद्योगाकरितां आलेले लोकच घ्यावयाचे. कारण इकडील रहिवाशांची अल्प कालच्या विद्याभ्यासामुळें विद्वान शब्दा पर्यंत मजल अजून आली नाहीं व एवढाले महत्विक विषयांचे उलगड्यापर्यंत त्यांची विच्यारशक्ती ही पोचली नाहीं. तेव्हा सुधारणेच्छु लोकांनीं वऱ्हाडांत ज्यांचे तोंडाकडे पाहावयाचें ते लोक पुणें, सातारा, नगर, खानदेश कोंकण वगैरे प्रांतांतून इकडे आलेले जे त्यांपैकींच अपेक्षित आहेत हें स्पष्ट आहे.

देशाचे हिताच्या व सुधारणेच्या ज्या आवश्यक कित्येक गोष्टी त्यांपैकींच पुनर्विवाह हा एक आहे व हा धर्मसंबंधांत लगटला गेला असल्यामुळें त्याविषयीं विच्यार करणें फार नाजुक होतें तरी तरुण विद्वानांनीं कित्येक वर्षें बहुत विच्यार करून शेवटीं त्यांपैकीं कित्येकांनीं शास्त्रवगैरे पाहून व समजून घेऊन निश्चय आणि छाती केली. व च्यार महिन्यांमागें विधिपूर्वक एके विधवेचा विवाह केला. त्या उत्तम व महत्विक कृत्याकरितां तरुण विद्वानांपैकीं सात भले गृहस्थ पुढारी झाले व त्यांनीं सुमारें सात कोटी विरुध्ध पक्षी लोकांची किंवा तत्कृत छळाची भीति न धरितां आपलीं नांवेंही प्रसिद्ध केलीं व पुनर्विवाहाचा मजबूद पाया घातला यास्तव ते धन्य होत व त्यांस आम्हीं या नव्या युगांतील सत्पत्रऋषी म्हणतों.

देशकालवर्तमानानुसार पुनर्विवाहाची अवश्यकता फारच आहे व त्यास शास्त्रही संमत आहे असें समजल्यावर दयालु मनाचा कोण सद्गृहस्थ तो न घडावा असें इच्छील? कोणी इच्छिणार नाहीं. व बहुत सुविच्यारी लोक त्या कृत्यास अनुकूल होतील अशा समजुतीनें वऱ्हाडच्या तरुण विद्वान मंडळीं पैकीं रा० रा० वामनराव प्रभाकर पराजपे यानीं मोठा हिंय्या करून आपल्या विधवा भगिनीचा पुनर्विवाह केला. ही गोष्ट त्यांस मोठी भूषणाई व लौकिकाची होय. याप्रमाणें वऱ्हाडांतील गृहस्थाकडून असें कृत्य घडलें तेव्हां दुसरे बहुत देशबांधव त्वरेंकरून त्यांची सथ करितील. व त्यांस कोणतीही अडचण येऊं देणार नाहींत व या लहानशा टापूंत त्यांच्या मंडळीचा या कामास एकचित्त झाल्याचा समुदाय मोठा विस्तृत होईल असें वाटलें होतें परंतु त्याप्रमाणें अजून घडून आलें नाहीं या बद्दल वाईट वाटतें.

चांगल्या मजबूद पायावर पुनर्विवाहाची एक हवेली बांधल्यावर बिनधोक दुसऱ्या हवेल्या तिच्या शेजारीं लवकर व पुष्कळ तयार व्हावयाच्या परंतु जुन्या लोकांनीं त्यांत थोडी हरकत घातली तणेंकरून सर्व हिंदुस्थानभर थोडे दिवस एक विलक्षण प्रकारचा आभास उत्पन्न होऊन लोकांचीं मनें चंचेल होऊन गेलीं होतीं व कित्येकांस असेंही वाटलें होतें कीं दुःखसमुद्रांत बुडालेल्या अनाथ, गरीब, व हतभाग्य विधवांच्या बालविधवांची ईश्वरानें कीव करून आपला वरदहस्त त्यांच्या सुखार्थ व वैधव्य हरणार्थ पुढें केलेला फिरून मागें नेण्याची त्याची इच्छा झाली आहे कीं काय? परंतु तसें झालें नाहीं. लवकरच तें भ्रांतिपटल नाहींसें होऊन स्वच्छ प्रकाशाचा उदय झाला व चांगल्या होइकाविषयीं लोकांस पुन्हां उमेद आली. हें ईश्वरीप्रसादाचें चिन्ह समजलें पाहिजे.

असो. विस्तार झाला यास्तव आतां आवरिलें पाहिजे. आजचे या निबंधांत वऱ्हाडांतील तरुण विद्वान मंडळीस आमचा प्रश्न आहे कीं पुनर्विवाहाचे कामीं तुमचे मनाची स्थिती कशी आहे? म्हणंज तुम्हीं अनुकूल आहा? किंवा प्रतिकूल आहा? किंवा उदासीन अगर मध्यस्थ आहा? हें तुम्हीं आपल्या समूहांत नीट विच्यार करून आपल्या स्पष्ट कृतीनें कळविलें पाहिजे. आपणास हें सांगावयास नकोच कीं कर्तव्य कर्मास जागरूक रहावें लागतें तें अशा अणीबाणीच्याच प्रसंगीं राहावें लागतें. गावसमाराधनेसारखा सुकाळ झाल्यावर मग त्यांत दहावीस भले काय व राहिले काय, त्यांकडे कोणी लक्ष देत नाहीं; पण जेथें मेजवानीचा थाट व मोजकीच मंडळी तेथें कोणी यावयास उशीर केला तर जमलेल्या सर्व मंडळीचें व कार्यकर्त्याचें लक्ष त्यांकडे लागून राहतें. हाच दृष्टांत प्रस्तुत विषयास सम्यक लागू आहे. असें आम्हांस वाटतें. अस्तु.

धर्माची गोष्ट फार नाजुक आहे, मुख्यत्वें ईश्वराची कृपासंपादनार्थ व साधारणत्वें आपलीं वडील धारीं आप्त गणगगोत इत्यादि लोकसंग्रहार्थ धर्मास धरून चाललें पाहिजे व तणेंकरून आपले मनास पाशस्त्य असतें असें विच्यारी प्राणी समजतोच आहे व त्या विरुद्ध जाऊन धर्मलंड होण्याविषयीं कोणी कोणास आग्रह किंवा उपदेश करावयाचा आहे असें नाहीं; तर धर्माचें संरक्षण होऊन देशाचें कर्तव्य कर्म आपण जें लागत आहां तें केलें पाहिजे. पुनर्विवाह धर्मशास्त्र संमत आहे अशा विषयीं ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. व त्याची सशास्त्रता प्रसिद्ध सभांमध्यें मोठ मोठाल्या शास्त्री लोकांच्या धेंडांपुढें पुनर्विवाह पक्षाची मंडळी प्रतिपादन करून दाखविण्यास एके पायावर तयार आहे. मग त्यांची बाजू प्रसिद्धपणें घ्यावयास तुम्हांस काय हरकत आहे? तुम्हीं ते एके देशांत जन्मला, बरोबर विद्या संपादन केली, सुधारणेचे, व लोकहिताचे हेतु एकसमयावच्छेदें त्यांचे तुमचे मनांत आले, सभांतून व वर्तमानपत्रांतून व्याख्यानें व निबंध तुम्हीं व त्यांनीं एकच हेतु धरून दिले, इत्यादि प्रकारांवरून तुमची पूर्ण संमती समजून व सुसमय पाहून त्या मंडळीनें अबला स्त्रियांचें वैधव्यदुःख हरणार्थ पुढें पाऊल टाकिलें, इतक्यांत मध्यं तरीं थोडी गडबड झाली ती पाहून तुम्हीं दचकला व स्तब्ध राहिला. तुम्हांस वाटलें कीं मंडळीवर फार मोठा भयंकर प्रसंग आला आहे पण आतां तुमचें तुम्हांसच कळलें असेल कीं ते सर्व प्रकार पोकळ आहेत. व त्यांस भिण्यांत कांहीं अर्थ नाहीं. भट, भिक्षुक, शास्त्री, पुराणीक, आचार्य, तसेच दुराग्रही व भोळे गृहस्थ यांनीं कट करून पुनर्विवाहप्रवर्तक सात गृहस्थांस बहिष्कृत केलें. हें त्यांच्या मतें असो पण हे तरुण विद्वानहो, तुम्हांस कसें मानवलें? नांवानें मात्र ते सात पुढारी आहेत पण कृतीसंबंधीं हे तूंत तुम्हीं सर्व सामील आहा, आणि असें असतां अशा प्रसंगीं औदासिन्य घेऊन तुम्ही मागें राहता, या तुमच्या करणीस काय म्हणावें? वास्तविक पाहिलें तर हिंदु धर्म हल्लींच्या स्थितींत जीर्ण दशेस आलेला असतां शास्त्रमतें त्यांत विधवाविवाह सुरू केला हा धर्माचा जीर्णोध्धार झाला, या बद्दल त्या मंडळीचे उपकार मानावयाचे ते भटांनीं एकीकडे ठेवून त्यांवर उलटें बहिष्काराचें शस्त्र झुगारिलें. व त्यांच्या मतानें बहिष्कृत ब्राम्हण हे शूद्रापेक्षांही नीच होत. आणि अशी मानहानी त्यांनीं आपल्या तरुण बंधूची केवळ दुष्टपणानें केली आहे व तुम्ही वऱ्हाडवासी त्यांचे कैवारी बांधव शांत मनानें अचल बसला आहा हें काय? अहो उठा, सज्ज व्हा, ईर्षा धरा, कर्तव्य स्मरा, देशकालवर्तमान जाणा, आणि अन्यायी बहिष्काराची व्यर्थता लोकांस दाखवा. म्हणजे कृपाळु परमेश्वर तुम्हांस यश व सैद्धा देईल.

विधवाविवाहाचें कार्य धर्मशास्त्रसंगत, पुण्यप्रद, व अनीतिहारक असल्य मुळें सात तरुण गृहस्थानीं मुंबई मुक्कामीं पुढें होऊन तें विध्युक्त संपादिलें. असें असतां दुरभिमानानें व अविच्यारानें कांहीं लोकांनीं त्यांस बहिष्कृत म्हटलें. परंतु शास्त्रार्था विषयीं वादविवाद होऊन तो विवाह अशास्त्र आहे असें ठरेपर्यंत हें बहिष्कार घालणें अश्लाघ्य व अन्याय्य आहे असें ठिकठिकाणच्या बहुत तरुण गृहस्थांनीं आपले सह्यांचे लेख देऊन प्रसिद्ध केलें. असे शूर गृहस्थ पुण्याचे १७२, मुंबईचे १६९, कोलापुरचे १२०, रत्नागिरीचे ४०, नाशिकचे २९, अमदाबादचे २१, मिळून ही संख्या सुमारें साडे पाचशांचे वर झाली आहे. व विधवाविवाहाचे समारंभांत भोजन केलेल्यांची संख्या शेदीडशांची आहेच. व सह्यांच्या नव्या नव्या यादींचा नित्यक्रम चालू आहेच. मग यांत बहिष्काराचा जोर काय राहिला? व त्याची भीति किती राहिली? आणि असें आहे तर आमच्या वऱ्हाडच्या तरुण विद्वानांनीं आपले विच्यार जे मनांत घोळत असतील ते बाहेर प्रसिद्धीस कां न आणावे? व पुनर्विवाह पक्षाच्या लोकांस सहाय कां न करावें? इतर ठिकाणच्या प्रमाणें वऱ्हाडांतूनही यादी गेली पाहिजे व पुनर्विवाहेतेचे दोघे तरुण बंधू वऱ्हाडांत मंडळीचे डोळ्यापुढें आहेत त्यांच्या सत्कृत्याच्या आदरार्थ तरी मंडळीनीं असें स्वस्थ बसावें हें त्यांस लाजिम नाहीं असें आम्हांस वाटतें. तर याचा विच्यार मंडळी एकत्र जमल्या प्रसंगीं व्हावा व यादी व्हावी हें विहित आहे. निदान तसे नच झाल्यास ज्याचे त्यांनीं आपलें मत तरी आम्हांस कळवावें म्हणजे आम्ही त्यांचे इच्छेनुरूप करूं. आतां आज हा विषय पुरा करितों.

---

### The Charge of Defamation against the Publisher of the "Poona Observer" Newspaper.

THE QUEEN VS. RUSTOMJEE DADABHOY.

In August last, Mr. D. H. Larpent, Joint Judge of Poona, forwarded the proceedings in the case for the orders of the Judges of the High Court under section 434 of the Criminal Procedure Code. Dr. A. G. Fraser tried the case. The complainant was Mr. T. Brooks, a watchmaker, and the defendant, Mr. Rustomjee Dadabhoy, was the printer and publisher of the *Poona Observer* newspaper. The complainant charged the accused with defamation of character under section 499 of the Penal Code, for having caused to be published in the issue of the *Poona Observer* of the 13th April last the defamation complained of. The magistrate convicted the defendant and fined him Rs. 50, or, in default, to suffer imprisonment for one month.

Mr. Larpent, in sending up the case to the High Court, said—The petitioner has been convicted by Dr. Fraser, Full Power Magistrate, of defamation, and sentenced to pay a fine of Rs. 50, or, in default, to rigorous imprisonment for one month. There is consequently no appeal against the decision. The Judge has sent for the record under section 434, and the petition has been delegated to me for disposal. The petitioner is the proprietor of the *Poona Observer*, and in the paper dated 13th April, he published the following para as "Local News".—"Disappearance of a European Watchmaker from the Camp Bazar.—Mr. T. Brooks, who had established himself for upwards of a year as a watchmaker in the Sudder Bazar, suddenly disappeared on Friday night last. Report says that watches belonging to several persons were not returned to them, which were given for repairs." It is urged before me that this para comes within the first exception of section 499, and also within the ninth. The statements complained of as defamatory are that Mr. T. Brooks "suddenly disappeared on Friday night last," also that watches belonging to several persons, which had been given to Mr. T. Brooks for repairs, had not been returned. I am of opinion that by Mr. Brooks's own admission, the truth of both these statements is substantially proved. Mr. Brooks says he left at 6 A. M. by the train. To do this he left his house at about 5 A. M. and hence the statement that he left "at night," though not strictly true, is but a slight exaggeration. It is imputed to him also that he "suddenly disappeared." I think his conduct shows that he did leave suddenly. He did not tell his landlord of his intended departure, and it is beyond a doubt that he did not personally return all the watches which had been given him for repair, but that eight watches were unreturned. Although all these watches were given to Mr. Norman and Mr. Divine to be returned, yet this conduct shows a suddenness of departure. It is shown also that he only spoke of his departure the previous day. As to the second statement, Mr. Brooks admits that he did not personally return the eight watches, and it is proved beyond doubt that they had not been returned at the time the para. appeared in the paper. It is proved also that a complaint was publicly laid before the Cantonment Magistrate on the 12th April by Mr. Brooks' landlord that he had abruptly left with two of his (the landlord's) watches. I think that Mr. Brooks behaved, to say the least, with great want of judgment, and that his movements were not incorrectly reported by the paper. I also think that the para. was inserted in perfect good faith and for the advantage of the public who, by the information they thus obtained, were enabled to get back their property. For these reasons I think the conviction should not stand, and I direct that the record be submitted to the High Court for its orders.

The Judges of the High Court concurring with Mr. Larpent, reversed the conviction and sentence against Rustomjee Dadabhoy, and ordered the fine, if paid, to be refunded to him.

---

## वऱ्हाड.

उमरावती पोस्टापैकी रा० रामकृष्ण भगवंत यास खामगावास ५०, रुपयांवर पे.

स्टमास्तर नेमिले व ते येथें येऊन आपले कामावर गेले.

इलिचपुरचे डि० कमिशनर मि० स्पान स्की साहेब आपले कामावर येऊन रुजू झाले. आतां मि० मेंजी साहेब उमरावतीस, व मि० लाटण साहेब इलिचपुरास स्माल-काज कोर्टाचीं कामें पाहूं लागतील.

सर्व वऱ्हाडांत आतां पाऊस कोठेंही नाहीं. थंडी चांगली पडूं लागली आहे. व पिकें सालमजकुरीं उत्तम आहेत. नागपुराकडेही पिकाचा आहवाल फार चांगला आहे.

शाळांच्या परिक्षा उमरावतीस सुरू झाल्या आहेत त्या आज संपतील. मुलांनीं दिलेल्या उत्तरांची निवड होऊन हुशारीच्या अनुक्रमानें यादी तयार झाल्यावर त्यांतील पन्नास मुलांची नुसत्या देशभाषेची परिक्षा बुधवारीं व गुरुवारीं होणार आहे. व त्यांतून दहा उत्तम निवडून त्यांस दहा दहा रुपयांच्या स्कालरशिप्स मिळणार आहेत. व बक्षिसें वाटण्याचा प्रसिद्ध समारंभ शुक्रवारीं होणार आहे.

उमरावतीस मुलांच्या भोजन खर्चाच्या वर्गणीची टीप झालेली सत्यप्रकाशांत छापिली आहे ती रकम सुमारें साडेच्यारशें रुपयांची आहे.

मलकापुर तालुक्यांत पिंपळगाव राजा येथ कमलनाथ जमादार याची बायको दुभत्याचे पेटीशीं कांहीं काढण्या करितांओणवी झाली असतां एक सर्प येऊन त्यानें तिचे कमरेस घट्ट विळखा घालून आपलें शेपूट तोंडांत आवळून धरिलें. बाईस प्रथम वाटलें कीं आपले मुलीनें येऊन आपलें कमरेस मिठी मारिली, पण मुलगी नव्हे व सर्प आहे असें दिसतांच तिनें आरोळी मारिली व मूर्छित होऊन जमिनीवर पडली. इतक्यांत लोक जमा झाले व युक्तीनें त्यानीं सर्प मारिला. मग बाई च्यार घटिकांनीं सावध झाली व ती सुखरूप आहे.

रेसिडेंट साहेबांनीं ठराव केला आहे कीं वऱ्हाडांत कैदी लोक सरकारी किंवा मुनसिप्यालिटीचे कामावर नेल्यास त्यांची मजुरी त्या वेळीं इतर तसल्या मजुरांस बाहेर जी मजुरी मिळत असेल तिचे दोन तृतीयांश अनमासाचे यादींत धरीत जावी.

मि० डिसनी पैमाषी कडील असि० सुपरइंटेंडेंट यांस दोन महिन्याची रजा मिळाली.

खामगावची सरकारी रेलवे जलम पासून साडे सात मैल होणार व त्याला खर्च अजमासें तीन लक्ष रुपये लागणार व तो बिलायत सरकारानें मंजूर केला आहे असें हिं० सर०नें प्रसिद्ध केले आहे.

रा० रा० भास्कर राव वाशिमचे तहशिलदार यांस फर्स्ट क्लास सबा० माजि० चा अधिकार मिळाला.

रा० रा० श्रीकृष्ण नरहर फ० क्ला० स० मा० यांस क्रि० प्रो० चे ६१ अ कलमांतील अधिकार मिळाला.

बडनेऱ्यापासून उमरावती पावेतोंही सरकारी रेलवे होण्याचें सांगशन झालें आहे असें मुंबईच्या चेंबर आफ कामर्सच्या रिपोर्टावरून समजतें. खामगावचें काम पुरें झाल्यावर तिकडे सुरवात होईल असें दिसतें.

क्या० वोडहौस साहेब यांस खामगाव आणि जलम रेलवे वरील मजूरदार व धनी यांजमधील वादांची चौकशी करण्याचा अधिकार दिला आहे.

खामगावच्या धर्मार्थ दवाखान्यावरी डाक्टर मि० लिंकोन यानीं राजिनामा दिला. व तेथें तूर्त मि० नारायण स्वामी उपर्यो आसि० यांस नेमिलें.

## अकोला.

कमिशनर साहेब वाशिमास सेशन भरण्याकरितां गेले आहेत.

मुनसिपल कमिटीच्या नवीन मेंबरांची गेल्या मंगळवारीं डिपुटी कमिशनरचे आफिसांत सभा भरली होती. तींत पहिल्याप्रमाणें रा० रा० विष्णू सदाशिव पिसोळकर यांस सेक्रटरी व रा० रा० वामनराव प्रभाकर परांजपे यांस असि० सेक्र० नेमिलें—कमिटीचें उत्पन्न हल्लीं पांच हजार रुपयांचें आहे तें खर्चास पुरें होणार नाहीं सबब नवीन कांहीं पट्टी बसविण्याचे विचाराकरितां मि० दस्तुर बहिमनजी साहेब, मि० गोविंदराज अय्या, व मि० जोरावरखां यांची एक सिलेक्ट कमिटी नेमिली दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या सोमवारीं डिपुटी आफिसांतच कमिटी भरत जावी असा ठराव झाला—अकोल्याचा मुनसिपल कमिटीचे हद्दीपुरता एक चांगला नकाशा तयार करण्याची मि० लेडलो साहेब यांस शिफारस झाली व त्याकरितां त्यांस १०० रु० देण्याचा ठराव झाला.

शेट गुलाबराय गोविंदराय यानीं मेसर्स चारनाक, रीड, आणि मिचल रेलवे कंट्राक्टर यांजवर सुमार १७००० रुपयांची फिर्याद केली होती तिचा या आठवड्यात फैसल झाला. शेटजीकडून सर्व रकमेची शाबिदी झाली नाहीं सबब पुरावा झाल्या रकमेपुरता म्हणजे फक्त ३४०० रुपयांचा मात्र त्यांस फैसल मिळाला. व इतकी रकम प्रतिवादी फिर्यादीपूर्वींही देण्यास कबूल होते म्हणून प्रतिवादीचा खर्चही शेटजीवर घातला व त्यांचा त्यांवर बसलाच. यावरून या दुकानासही बरीच गोळी लागली म्हणावयाची. प्रतिवादीनीं या कामाकरितां मुंबईहून युरोपियन सालिसिटर आणिले होते.

डिपुटी कमिशनर साहेब खामगावास गेले आहेत.

रा० रा० माधवराव हरी डि० कमि० चे शिरस्तेदार कांहीं घरगुती कामाकरितां रजा घेऊन नाशकास गेले आहेत.

गेल्या सोमवारीं उमरावतीस जाणाऱ्या लोकांची व मुलांची रेलवे स्टेशनावर फारच गर्दी झाली होती. प्रदर्शनाची दाटी किंवा लहानशी यात्रा म्हटल्यास शोभेल. गाड्यांतून रीघ थोडी होती व लोक पुष्कळ गेले म्हणून त्यांचा त्या दिवशीं फार चेंदा झाला व पोलिसानेंही प्लयाटफार्मवर बरीच भालेरायी केली.

भुसावळेस नुकतीच साहेब लोकांची मोठी मेजवानी झाल्याचें गेल्या आठवड्यांत लिहिलें आहे तिजविषयीं थोडा लेख मुंबईचे ग्याझेट वर्तमान पत्रामध्यें आला आहे त्यावरून समजतें कीं १३ वे तारखेस तेथें मंडळी जमली. १४ व १५ तारखेस दिवसां क्रिकेटचे म्हणजे चेंडूदांडूचे खेळ झाले. व रात्री मेजवान्या आणि नाच झाले. मडमा व साहेब लोक मिळून १२० जमले होते. मुंबई, खानदेश, नेमाड, नागपुर व वऱ्हाड प्रांतांतील साहेब लोक गेले होते. स्टोरचा मोठा बंगला होता त्यांत मेजवानीचा थाट केला होता व ती जागा फार सुशोभित केली होती. तशीच रोशनाई उत्तम होती व बंडबाजा होता तीन दिवस खाणें पिणें, नाचणें, व खेळणें यासंबंधीं आनंदांत गेले. तापी नदीचा पूल व तेथील देखावा पाहाण्यास ही मंडळी गेली होती. मेजवानीचे प्रसंगीं आमचे येथील कमिशनर मि० लायल साहेब यानीं कांहीं उत्तम भाषण केलें व त्यात मि० ब्रेटन साहेब रेलवेचे चीफ कमिशनर हा समारंभ करणारे यांची तारीफ करून आभार मानिले. दुसरीही येक दोन भाषणें झालीं. क्रिकेटचे खेळांतही जागोजाग नावें लिहिलीं आहेत त्यांत आमचे कमिशनर मि० लायल साहेब व असिस्टंट कमिशनर मेसर्स वोडहौस साहेब व निकोल्स्ट साहेब वगैरेचीं नावें आलीं आहेत इत्यादि प्रकारांवरून वऱ्हाडांतील आमचे सरदारा लोकही खेळांत अग्रणी होते असें दिसतें.

या क्रिकेट खेळाचे प्रकार इंग्रेश पत्रांतून फार तपशिलवार आढळतात. एक बाजूस अमुक लोक होते, दुसरे बाजूस अमुक होते. अमुकानें चेंडू झुगारिला, अमुकानें उलटून टोला दिला, एकंदर टोले अमुक बाजूचे अमुक, इत्यादि लिहिलेलें असतें व हें वहिवाटीवरून किंवा त्यांत कांहीं अधिक बारकावा किंवा अधिक मौज असल्यावरून कशावरून त्यांस शोभत असेल तें असो. आमच्या नेटिव लोकांच्या पध्धतीप्रमाणें दांडूविटीचे खेळ, व त्यांतील सर्व बारीक बारीक गोष्टी प्रसिद्ध करणें म्हणजे थट्टा किंवा पोरचेष्टा समजतील. व वर्तमानपत्र तर अशा गोष्टीस स्थलच नव्हे असें सर्व म्हणतील. पण युरोपियन लोकांत व त्यांच्या वर्तमानपत्रांत अशा गोष्टी हमेशा पाहण्यांत येतात तेव्हां त्याची आमच्यापेक्षां वेगळ्या प्रकारची समजूत व रुची आहे असें दिसतें.

मुंबईच्या हाय कोर्टांतील जड्ज आनरबल जस्टिस वार्डन साहेब व आनरबल जस्टिस लायड साहेब गेले मंगळवारीं इकडून आगगाडी मार्गें नागपुरास गेले. व तिकडून ते कलकत्यास जाणार आहेत.

मयत तहशीलदार बेजनजीआर्देसरजी यानीं आपली रक्षा चांदबी इला आपले सर्व जिनगीचा वारसा देऊन तसें मृत्युपत्रांत लिहून ठेविलें. त्यावरून तिनें वारसाचे आक्टाप्रमाणें प्रोबेट मिळण्याविषयीं अर्ज केल्यावरून मि० करशेटजी नसरवानजी नाशिकचे पोलिस इन्स्पेक्टर मयताचे बधू यानीं हरकतीचा अर्ज केला आहे. व त्या मुकदम्याची चौकशी डिपुटी कमिशनरकडे होणार आहे. पारशी जातीचा मनुष्य निपुत्रिक मरण पावला तर त्याचे क्रियाकर्म करितां तिसरे दिवशीं दत्तक पुत्र करित असतात. व तो वारस होत असतो असा पाठ आहे व त्याप्रमाणें कावसजी नावाचा मुलगा मयतास दत्तक दिलला आहे. व तो यानीं जिवंतपणींही पुत्र ठराविला होता असें ऐकण्यांत आलें आहे. हल्लीं तो अज्ञान म्हणून पालन करणार सद्गृहू चुलते यानीं चांदबी इला हरकत आणिली आहे.

## वर्तमानसार.

कोलापुरचे राजे साहेब पुढील मार्च महिन्याचे सुमारास विलायतेस जाणार असें वर्तमान आहे.

मुंबई इलाख्याचे विद्याखात्याचे डायरेक्टर जानेवारी महिन्यांत गुजरार्थेतील शाळा पाहण्यास जाणार आहेत.

मुंबई इलाख्यांत जिल्ह्याच्या गावीं जीं हायस्कुलें आहेत त्यांच्या परीक्षेकरितां पुढील वर्षापासून एलफिन्स्टन कालेजांतून दोन दोन प्रोफेसर जाणार असें वर्तमान आहे.

कराचीस अजून महामारीचा उपद्रव सुरू आहे.

पुणें, सातारा सोलापुर, नगर, खानदेश, बेळगाव, रत्नागिरी, नागपुर वगैरे ठिकाणीं पाऊस बंद होऊन चांगली थंडी पडूं लागली आहे.

कोलापुरचे राज्याचा गुदस्त सालचा हिशेब पाहतां तेरा लक्ष रुपये शिलक राहिली. तिगस्त सालीं साडेपाच लक्ष राहिली होती.

**बेळगाव**—डि. डिपुटी रावबहादूर विष्णु परशुराम रानडेचे हे तारीख १३ रोजीं एथें येऊन दाखल झाले.

गेले शुक्रवारीं पुण्यास गवर्नर साहेब यांस काठेवाडांतील गोंडळचे राजे, व सातार जिल्ह्यांतील बापूसाहेब निंबाळकर नाईक फलटणकर जाहागीरदार, व श्री० धुंडिराज चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब सांगलीकर, व श्रीमंत आपासाहेब कुरुंदवाडकर अशा चार संस्थानिकांनीं मेजवानास बोलाविल्याप्रमाणें त्या रोजीं नेक नामदारांची स्वारी गेली होती. सांगलीकर यानीं नामदारांस एक मोत्यांचा कंठा नजर केला. ज्ञा० च०

रावबहादूर रामचंद्र सखाराम यांस सरकारानें दप्तरदार पुणें कलेक्टर या जाग्यावर नेमिलें होतें त्याप्रमाणें ते प्रस्तुत काम करीत आहेत. परंतु हल्लीं असें ऐकतों कीं ती जागा कमी केली यामुळें त्यांस परत आपल्या पाहिल्या सोलापूर जिल्ह्यांतील मामलतदारीचे जाग्यावर जाणें भाग पडेल.

ज्ञा० च०

बडोद्याचे राजानीं गेल्या सालांत आपले रयतेस पंधरा लक्ष रुपये सूट दिली.

पुढील महिन्याच्या सातवे तारखेस विलायतेहून मुंबईस जी आगबोट येईल. तींतून सर रिचर्ड टेंपल साहेब येणार आहेत असें कळतें.

महमद अजीमखान काबूलचे माजी नबाब मरण पावले असें वर्तमान आहे.

संयोगजन्य रोगाचा आकट एथें लागू झाल्यामुळें कांहीं कसाविणी बाहेर गावीं निघून गेल्या.

## जाहिरखबरा.

### NOTICE.

Wanted Several Petty Contractors for the purpose of Quarrying Stone, required for the Khangaon State Railway Division, all parties are requested to apply in person to.—

C. JAMES CAREY.
Executive Engineer
Khangaon State
Railway Division.

## जाहिरात.

खामगांवच्या सरकारी रेलवेस खाणींतून दगड काढण्याकरितां लहान लहान कंत्राटदार पाहिजेत, ज्यांस अर्ज करणें असेल त्यानें स्वत: येऊन खालीं सही करणाराकडे अर्ज करावा.

( सही ) के. जेम्स केरी एक्झिक्युटीव इंजीनियर सरकारी रेलवे खामगांव.

नोटिस—सर्वांस कळविण्या करितां खालीं सही करणारा कडून देण्यांत येतें कीं अंबादास लक्षुमण कुळकर्णी कसेबे तळ गाव तालुके अकोट यांजकडेस आमचे घेणे असांन आम्ही अकोलें येथें नंबर १२२ सन १८६९ चा दावा केला आहे आणि अम्हास पैसा न मिळावा असे ईरादानें अंबादास हा आपली जिंदगी फरोक्त किंवा गाहाण किंवा बक्षीस वगैरे कोणतेही प्रकारें कोणास देईल तर ती कोणी घेऊ नये व अंबादास याणी कोणास देऊनये. दिली असतां आमचे देण्याचे इरादानी ती दिली असें मानले जाईल कळावें तारिख २० माहे अक्टोबर सन १८६९ इसवी मुक्काम अकोलें.

( सही ) आवजी वलद संभाजी तेली टस्का [illegible]

लण्डन शहराची लांबी सुमारें १८ मैल व रुंदी ७ मैल आहे. सन १८६१ सालांत झालेल्या खाने सुमारी प्रमाणें या शहरांत २८,०३,०३४ मनुष्यें आहेत. घरें ३,६५,८९० आहेत. दर आठवड्यास सुमारें १३०० मनुष्यें मरतात व सुमारें १८०० मुलें जन्मतात. शहरांत ४.०५,००० ग्यास लाइटाचे दिवे आहेत. दरसाल ६ लक्ष टण कोळशाचा खर्च आहे. दरसाल ४,४०,००,००० ग्यालन पोर्टर व २,०,००,००० ग्यालन दुसऱ्या साधारण प्रकारचें मद्य लागतें. शिवाय वाइन वगैरे उत्तम प्रकारचें मद्य लागतें. सुमारें ३६,००० डुकरें, २९,००० वासरें, २,५०,००० बैल, २०,००,००० मेंढ्या, व ५०,००,००० वनपशू, इतके भक्षस्थानीं पडतात. याशिवा य कोट्यावधी माशांचा खप आहे तो निराळाच. ने० ओ०

## नवीन व्रतरत्नाकर.

हा ग्रंथ वेदशास्त्रसंपन्न राजश्री शामराव दादा पौराणिक इनामी जहागीरदार मौजे निंबगांव तालुके माळाशिरस यांणीं नवीन केला आहे. यांत संपूर्ण व्रते एक वर्षांत जितकीं येतात तितकीं सर्व असून व्रताचे आरंभीं त्याचा शास्त्रार्थ लिहिला असून दर एक व्रताची पूजा, कथा, उद्यापन, यांशिक, प्रयोगसुद्धां तयार केला आहे. तो मालकीचा हक्क आम्हास दिला असून तो हल्लीं आमचे छापखान्यांत शिळाप्रेसावर छपण्यास आरंभ केला आहे. हा ग्रंथ अनुष्टुप छंदानें सुमारें १७००० होईल. त्यांत पूर्वींचे आधारानें सर्व व्रतें घातलीं असून रचना मात्र नवीन विद्वन्मान्य व आबाल वृद्धांस समजावें अशी सुलभ केलेली आहे. व्रतें सर्व तिथीक्रमानें, तसेंच संक्रांती व नक्षत्र अशा क्रमानें मालिका घातली आहे. खेरीज स्फुट व्रतें प्रसन्न राघव व सत्यनारायण अशीं बहुतकरून सर्व यांत आहेत. याजबद्दल व्रतार्क, व्रतराज, व्रतकौमुदी असे पूर्वींचे ग्रंथ आहेत परंतु ते दुर्बोध आणि संक्षिप्त प्रकार आहेत. आणि हा ग्रंथ साग्र असोन यांत कोणतेही रीतीची अडचण येईल असा नाहीं असे प्रकारचा असोन सर्व भिक्षुक व विद्वान यांस उपयुक्त असा आहे. ग्रंथ कर्त्यांनीं अनेक ग्रंथाधार पाहून फार मेहेनतीनें रचना केली आहे. यांत व्रतास ग्राह्य, अग्राह्य पदार्थ व काल द्रव्यादि प्रतिनिधी असा सर्व खुलासा केला आहे. याचा चतुष्पत्री साचा असून मोठें सुवाच्य अक्षरांनीं लिहून कागद फार उत्तम जाड घातले आहेत आणि याची किंमत सर्वांस सुलभ रितीनें पडावी अशी ठेविली आहे. आगाऊ पैसा देणारांस रु० ६ सही करणारांस रुपये ७ व मागाहून रुपये ८ पडतील. डाक हांशील शिवाय पडेल. आगाऊ पैसा भरणें अगर पत्रें पाठविणें असेल त्यांणीं सोलापूर येथें, ' कल्पतरु " छापखान्याचे मालक यांजकडे, अगर सातारा येथें महाराष्ट्रमित्र कर्ते यांजकडे, अगर पुणें येथें ज्ञानचक्षूचे मालक यांजकडे, अगर अकोला येथें वऱ्हाड समाचार पत्राचे मालक यांजकडे पाठवावीं. हा ग्रंथ माहे फेब्रुआरी सन १८७० इसवी अखेर तयार होऊन मार्च महिन्यांत वर्गणी दारांस मिळेल. किंमतीबद्दल टिकिटें पाठविणें झाल्यास वर्तीळ्यासह यावीं. पत्रें पोष्टपेड यावीं. या ग्रंथास विद्वान व सुज्ञ आश्रय देतील अशी आशा आहे.

ता० ४ जुलई १८६९ इसवी.

कल्पतरुचे मालक

## जाहिरनामा.

डिपुटी कमिशनर जिल्हा अकोलें प्रांत वऱ्हाड यांचे कोर्टांतून:—

मिस्तर बेजनजी आरदेसरजी माजी तहशिलदार तालुके अकोले हे तारीख २७ माहे जानेवारी सन १८६९ इसवी रोजीं अकोलें येथें मयत झाले. त्या मयतांनीं तारीख २२ जानेवारी सन मजकूर रोजीं लिहून दिलेलें उईल (मृत्युपत्र) चांदबी निसबत बेजनजी इणें आमचें कोडतांत हजर करून सन १८६५ चा आक्ट १० प्रमाणें प्रोबेट् मिळणें विषयींचा अर्ज केला आहे. त्याची चौकशी हें कोर्ट तारीख १५ माहे आक्टोबर सन १८६९ इसवी रोजीं करील सबब या जाहिरनाम्यावरून सर्वांस कळविण्यांत येतें कीं, सदरील नेमलें तारखेचे आंत कोणी येऊन वर लिहिले चांदबी इजला प्रोबेट न मिळतां आपल्यास मिळावें अशी तक्रार न केल्यास चौकशी होऊन चांदबीस प्रोबेट दिलें जाईल. मुक्काम अकोलें तारीख २२ माहे सप्टेंबर सन १८६९ इसवी.

मधवराव हरी
शिरस्तेदार.

C. Hordern
आफि० डिपुटी कमिशनर.

## प्रश्नोत्तर व्याकरणसार

अथवा

नवीन बालव्याकरण

हें पुस्तक छापत आहे लौकर तयार होईल. बाल व्याकरणांतील मुळचे विषय ठेवून दादोबा व दुसरे व्याकरणाचे ग्रंथांतील मुख्य विषय जेथचे तेथें घातले आहेत ह्या वरून लहान मुलांस व नवीन शिकणारास अभ्यास अल्प श्रमानें होईल असें पुष्कळ अनुभवशीर मास्तरांचें मत आहे. लघुव्याकरण शिकावयाची गरज राहात नाहीं. बुक बालव्याकरणाचे दुप्पट आहे. किंमत फारच थोडी म्हणजे दीड आणा ठेविली आहे. दहा प्रती घेणारास टपाल खर्च पडणार नाहीं. सर्व लोकांनीं आश्रय द्यावा अशी प्रार्थना आहे. खाली सही करणाराकडे पैसा पाठवतांच बुकें रवाना होतील.

सखाराम बापू शेट दांडेकर मास्तर
शाळा ठाणें.

## जाहिरात.

खालीं सही करणार यांजकडून सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें विनंती पूर्वक कळविण्यांत येते कीं कार्तिक वद्य ३ शके १७९१ संमत १९२६ तारीख २२ नोंवेंबर सन १८६९ इसवी सोमवार पासून पेठ खामगांव तालुके बाळापूर जिल्हा अकोले प्रांत वऱ्हाड येथें आठ दिवस पर्यंत आमचे धर्मा प्रमाणें देवाचा उत्सव होण्याचा असोन त्या संबंधी यात्राही आहे. या यात्रेंत मनुष्यांचा समाज ही पुष्कळ व्हावयाचा याकरितां ज्यांची खुषी असेल त्यांणीं ह्या यात्रेस येण्यास अनमान न करतां यावें.

कोणाची खुषी येथें यात्रेंत माल आणून विकण्याची असल्यास त्यांणीं माल आणून पाहिजे तर विकावा.

यास्तव या जाहिरातीनें व्यापारी वगैरे सर्वत्र लोकांस कळविलें जात आहे कीं ज्या कोणास ह्या यात्रेकरितां यावयाचें असेल ते जर येतील तर त्यांचे आम्हांवर फार आभार होतील. कळावें मिती आश्विन शुद्ध ४ संमत १९२६

(सही) शामलाल वीरदास दुकान
पेठ खामगाव दस्तुर खुद्द

## जाहिरखबर.

नोटिस—श्रावण वल्लद लखमाजी चांभार डबाले वस्ती मौजे साईत परगणें पिंजर तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं हरी चांभार याजकडे आमचे रुपये ७८४ याजवरून याचा हवाला तुम्ही तारीख २४ जानेवारी सन १८६९ इसवी रोजीं घेऊन सदरील रुपये व व्याज दरशेकडा दोन रुपये प्रमाणें पंधरा दिवसांत देण्याचा करार केला असून आजपर्यंत रुपये दिले नाहींत तर ह्या नोटिशीनें कळवितों कीं ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत रुपये ७८४ व आजमित्ती पावेतों दोन रुपये शेकडा प्रमाणें झालेलें व्याज व ह्या नोटिशीचा खर्च आणून द्यावा. न दिल्यास मुदती उपरांत फिर्याद करून तोही खर्च तुम्हावर पडेल कळावें तारीख १७ आक्टोबर सन १८६९ इसवी.

(सही) गोविंदा वल्लद लक्षुमण चांभार मेहेतर दस्तुर खुद्द

नोटिस—नागोजी वल्लद बाहिरजी जाधव वस्ती घुईखेड तालुके उमरावती यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुम्हाकडून आमचे रुपये व ज्वारी येणें असोन पुर्व्याचे करारा प्रमाणें दिल्हे नाहींत. हल्लीं ही नोटिस पावल्या पासून आठ दिवसांत रुपये दाखल करावे ते न केल्यास नोटिसचें खर्चासुद्धां एकदम दावा करून घेण्यांत येईल कळावें तारीख १७ अक्टोबर सन १८६९ इसवी मु० अकोलें.

(सही) सामाजी भवानी कुळकर्णी खेडलें तालुके बाळापूर.

नोटिस—रामजी वल्लद विठोबा सोनार वस्ती अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुम्हास आम्ही गेले सालच्या भाद्रपद शुद्ध १ प्रतिपदा रोजीं मुलाचे तोडे करण्या करितां चवदा तोळे सहामासे चांदी दिली असून आजपर्यंत तोडेही तयार करून न देतां चांदीही परत देत नाहीं तर ह्या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं आठ दिवसांत आमचे अम्हांस तोडे आणून देऊन तोडे करण्याची मेहेनत घेऊन जावी. तोडे तयार नसल्यास आमची चांदी तशीच परत आणून द्यावी. ह्याप्रमाणें न केल्यास चांदीच्या किमतीची फिर्याद करून आज मिती पावेतों दोन रुपये शेकडा प्रमाणें व्याज व नोटिशीचा आणि फिर्यादीचा खर्च भरून वेऊ कळावें. तारीख १७अक्टोबर सन १८६९ इसवी.

(सही) तुकाराम वल्लद विश्वनाथ पुराड दस्तुर खुद्द.

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केलें त्यास दोन वर्षें पुरीं झालीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस हो विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं-

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धआणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

### TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present and past years, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

## नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत मागेंच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ०६ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल. व. स. म्यानेजर.

| किमतीचे ठराव. | रु. | अ |
|---|---|---|
| वर्षांची अगाऊ देणारास··· ··· | ६ | ० |
| साल अखेर ··· ··· ··· | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ··· ··· | ३ | ८ |
| एक अंकास ··· ··· | | ५ |
| फुटकळ ··· ··· ··· | ० | ५ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षांचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

अगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

### नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत··· ··· ··· १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।१।०६

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

वर्षें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छा[illegible] मजल्यांत मालकांकरितां छापून प्र० केलें